MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष विसावे/अंक १०/ऑक्टोबर २०१९

## संपादकीय

### वाट विज्ञानाची

विज्ञान म्हणजे 'विशेष ज्ञान'. या विशेष ज्ञानाने निसर्गातील अनेक नियमांची मानवाला माहिती झाली. विज्ञानाच्या मदतीने मानवाला निसर्गाची काही गुपिते उकल करता आली. या प्रयत्नांतून अनेक वैज्ञानिक तत्त्वे माणसाला माहीत झाली. या तत्त्वांचा वापर करून मानवाने तंत्रज्ञान विकसित केले आणि आपले आयुष्य सुकर केले. जगातील प्रत्येक देश तंत्रज्ञानाची कास धरून प्रगती करू इच्छित आहे. औद्योगिक क्रांती नंतर युरोप मध्ये जी सुबत्ता आली याचे मूळ तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापरातच आहे. औद्योगिक क्रांतीत जे देश मागे पडले त्यांनी थोड्या उशिरा का होईना तंत्रज्ञानाचीच कास धरली. या मार्गाने अनेक देशांनी अलीकडच्या काळात नेत्रदीपक कामगिरी करून दाखवली आहे. यामध्ये चीनची प्रगती एकदम उठून दिसते. २००४ साली मी पहिल्यांदा चीनला गेलो. त्यानंतर वेगवेगळ्या कारणांनी मला चीनला जाण्याची संधी मिळाली. प्रत्येक वेळेला मला या देशातील वेगवेगळ्या शहरांना भेट देता आली. त्यामुळे देशाचा बराचसा भाग बघता आला. कोणत्याही शहरात जा, आजूबाजूला नजर टाकली की प्रगतीच्या पाऊल खुणा दिसणार हे नक्की. रस्ते, इमारती, विजेची रोषणाई, नगराची रचना, वाहतूक व्यवस्था या सगळ्या बाबतीत देशात तंत्रज्ञानाचा पूरेपूर वापर केलेला आढळतो. याहीपेक्षा नजरेत भरते ते तंत्रशिक्षण पुढच्या पिढीला देण्याची त्यांची धडपड. अभियांत्रिकी महाविद्यालये तर हे काम पद्धतशीरपणे करीत आहेतच. याखेरीज शाळा शाळांमधून विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञान-साक्षरता कशी येईल यासाठी विशेष प्रयत्न केलेले आपल्याला दिसतात. याची काही प्रत्यक्ष पाहिलेली उदाहरणे येथे देत आहे.

प्रतिकृती तयार (Model Making) करणे हे एक कसब आहे. यासाठी चीनमध्ये शालेय स्तरावर विशेष प्रयत्न केले जातात असे दिसते. एका आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी मी शांघायला गेलो असताना शहरातील महानगरपालिकेच्या एका शाळेला भेट देण्याची मला संधी मिळाली. त्या शाळेत विज्ञान आणि गणित शिक्षणासाठी प्रयोगशाळा होत्याच; त्याचबरोबरीने प्रतिकृती बनविण्यासाठी एक वेगळी प्रयोगशाळा होती. या प्रयोगशाळेत वेगवेगळ्या प्रतिकृती कशा बनवायच्या यांचे शिक्षण दिले जात असे. प्रयोगशाळेच्या चारही भिंतींवर याआधी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या अनेक

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**


प्रतिकृती ठेवलेल्या होत्या. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या बोटी, विविध उपयोगासाठी वापरली जाणारी विमाने, अंतरिक्षात सोडलेले उपग्रह यांचा भरणा होता. जगाच्या कानाकोपऱ्यात आढळणारे पूल मला तेथे एकाच ठिकाणी पाहायला मिळाले. शालेय स्तरावर दरवर्षी प्रतिकृती बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत विजयी झालेल्या मुलांना बक्षिसे दिली जातात. त्यामुळे प्रतिकृती बनविण्यासाठी प्रेरणा मिळते.

अलीकडच्या काळात त्रिमितीय छपाई (Three Dimensional Printing) हे एक नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. याचे शिक्षण भारतात बहुधा अभियांत्रिकी महाविद्यालयात दिले जात असावे. चीनमध्ये मात्र त्रिमितीय छपाईचे शिक्षण शालेय स्तरावर दिले जाते. विशाखापट्टनम येथील श्री प्रकाश विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन मी एकदा बेजिंगच्या शाळेत गेलो होतो. त्या शाळेच्या प्रयोगशाळेत डझनभर त्रिमितीय छपाई यंत्रे होती. त्यांचा वापर करून आमच्या सोबत आलेल्या विद्यार्थ्यांनी सुंदर सुंदर वस्तू बनविल्या. ही यंत्रे नियमितपणे वापरली जातात असे आम्हाला सांगण्यात आले. याची प्रचीती तिथे ठेवलेल्या प्रदर्शनीय वस्तूंवरून येते. या यंत्रांचा वापर कसा करावा, कोणती वस्तू कशी बनवावी याची माहिती देण्यासाठी शाळेत विशेष शिक्षक नेमले आहेत.

आजच्या काळात यंत्रमानव (Robot) अनेक कामे करू लागले आहेत. कारखान्यात जेथे एकाच प्रकारचे काम पुन्हापुन्हा करायचे असते तेथे माणसाच्या ऐवजी यंत्र मानवाला कामाला जुंपले जात असे. आता तर अनेक लहानसहान कामासाठी यंत्रमानवाचा उपयोग केला जात आहे. त्यामुळे या क्षेत्राशी परिचय असणे नवीन पिढीला अतिशय आवश्यक झाले आहे याची जाणीव ठेवून चीनच्या शाळांमध्ये रोबोटिक्स (Robotics) हा विषय शिकवला जातो. यंत्रमानव काम कसे करतो याची माहिती देऊन काही साधे यंत्रमानव बनवायला त्यांना प्रोत्साहन दिले जाते. चीनच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटनेने (China Association of Science and Technology) आयोजित केलेल्या एका नवनिर्मिती शिबिरासाठी (Innovation Camp) आम्हाला काही महिन्यांपूर्वी नॅनिंग या गावात जाण्याची संधी मिळाली. एक नवनिर्मिती शिबिर नगरपालिकेने चालविलेल्या एका सरकारी शाळेत होते. त्या शाळेत यंत्रमानवासंबधी माहिती देण्यासाठी आणि यंत्रमानव बनवायला शिकविण्यासाठी एक सुसज्ज अशी प्रयोगशाळा होती. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांनी बनविलेले अनेक यंत्रमानव दाखवायला ठेवले होते. विशेष हे की, देशात विविध स्तरांवर यंत्रमानव स्पर्धा आयोजित केली जाते. त्यामुळे या कामाला सतत उत्तेजन मिळते आणि त्यासाठी लागणारी सामग्री उपलब्ध करून दिली जाते.

शाळेत सुविधा निर्माण केली की सर्व काही सुरळीत चालेल असे म्हणणे धाडसाचे आहे. याची जाणीव चीनच्या शिक्षणतज्ज्ञांना आहे. म्हणून त्यांनी शाळांना मदत करण्यासाठी जिल्हा स्तरावर विज्ञान तंत्रज्ञान केंद्रे उभारली आहेत. या केंद्रात काम करणारे तंत्रज्ञ सतत शाळेच्या संपर्कात असतात. अनेक मार्गांनी शालेय शिक्षक आणि विद्यार्थी यांना ते सतत मदत करत असतात. शिक्षकांसाठी या केंद्रात ठरावीक कालावधीनंतर प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातात. विद्यार्थी देखील या केंद्रात येऊन प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतात. त्यासाठी त्यांना आगाऊ नोंदणी करावी लागते आणि आपला क्रम

(पृष्ठ क्र. २१ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष विसावे/अंक १०/ऑक्टोबर २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | ८ |
| ४) | NI-सुधारणा विधेयक का महत्वाचे? | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | १० |
| ५) | जपानचा इतिहास | गौरी अंबाजी परब | १४ |
| ६) | गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांची प्रार्थना | डॉ. दीपक बोरगावे | १७ |
| ७) | समतोल गझलसंग्रह | प्रा. श्रीपाद जोशी | २२ |
| ८) | आर्थिक मंदी : एक राजकारण | श्री. चन्द्रशेखर टिळक | २५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी
## (भाग - ३)

*चीनचे परराष्ट्र धोरण व त्याचा भारतावरील विपरीत परिणाम याचे विवेचन करणारा लेख - संपादक*

पाकिस्तानला १९६२ पासून चीनविषयी न भूतो न भविष्यती असे प्रेम निर्माण झाल्याचे लक्षात येते. मात्र हाच पाकिस्तान १९६२ पूर्वी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रामुख्याने तिबेटच्या वादावर चीनविरोधी भूमिका घेताना दिसत असे. १९६२ मध्ये असे काय घडले की ज्यामुळे पाकिस्तानला चीनविषयी एवढे प्रेम निर्माण झाले. याचे उत्तर असे की, चीनने १९६२ साली भारतावर आक्रमण करून भारताचे लष्करीदृष्ट्या मोठ्या प्रमाणात नुकसान केल्यामुळे पाकिस्तानला आसूरी आनंद झाला. या युद्धात भारताचे फक्त लष्करीदृष्ट्याच नुकसान झाले नाही तर चीनने भारताचा बराचसा भूभाग देखील गिळंकृत केला. त्यामुळे शत्रूचा शत्रू आपला मित्र या नात्याने पाकिस्तान चीनची हुजूरेगिरी करताना दिसतो. १९६२ च्या चीन-भारत युद्धानंतर चीनने देखील भारताविरोधी परराष्ट्र धोरणाचा स्वीकार करून पाकिस्तानला सर्वोतोपरी मदत करण्याचा जणू काही विडाच उचलला आहे असे म्हणावेसे वाटते.

१९६५ साली झालेल्या भारत-पाक युद्धादरम्यानदेखील पाकिस्तान व चीन सततपणे एकमेकांच्या संपर्कात होते. पाकिस्तानने भारतावर लादलेल्या या युद्धात भारत शर्थीने लढत असताना चीन पुन्हा एकदा लडाख व सिक्कीमच्या सीमांवरून भारतावर आक्रमण करेल अशी अपेक्षा पाकिस्तानला होती. परंतु भारताने दाखवलेल्या मुत्सद्दीपणामुळे शेवटपर्यंत चीनला या युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उघड-उघड हस्तक्षेप करता आला नाही. परंतु या युद्धापासून चीन मोठ्या प्रमाणात पाकला शस्त्र (निदान सुरुवातीच्या काळात तरी अतिशय निकृष्ट दर्जाची) पुरवठा करू लागला.

१९७० साली पूर्व-पाकिस्तानातील शेख मुजीबुर रेहमान यांच्या आवामी लीग या पक्षाला (त्यांच्या कन्या शेख हसीना वाजेद या सध्याच्या बांग्लादेशाच्या पंतप्रधान आहेत) बहुमत मिळाले व पाकिस्तानात (पश्चिम व पूर्व पाकिस्तान) या बंगाली मुस्लिम नेत्याच्या पक्षाचे सरकार अस्तित्वात येणार होते. परंतु पूर्व पाकिस्तानातील बंगाली नेता पाकिस्तानचा (पश्चिम व पूर्व पाकिस्तान) शासक बनणार ही गोष्ट पश्चिम पाकिस्तानातील उर्दू, पंजाबी, पाश्तो व सिंधी बोलणाऱ्या नेत्यांना रुचली नाही. त्यामुळे पाकिस्तानचे तत्कालीन लष्करशहा याह्याखान यांनी पूर्व पाकिस्तानात लष्कर घुसवले व मुजीबूर रेहमान यांना तर अटकेत टाकलेच, परंतु पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषक जनतेवर देखील अत्याचार करण्यास सुरुवात केली. यामुळे पूर्व पाकिस्तानातील अनेक लोक भारतामध्ये आश्रित म्हणून पळून येऊ लागले. ही संख्या काही काळातच लाखोंवर जाऊन पोहोचली. त्यामुळे भारताच्या बंगाल तसेच आसाम आदी सीमावर्ती भागांमधील संसाधनांवर ताण पडू लागला. तसेच, भारताने पाकिस्तानच्या लष्कराने पूर्व पाकिस्तानात चालविलेल्या नरसंहाराविरुद्ध व त्यातून भारतात येणाऱ्या लोंढ्यांविरोधात ठाम भूमिका घेतली. जेव्हा लाखो लोक पूर्व पाकिस्तानातून भारतात येतात तेव्हा ही पाकिस्तानची अंतर्गत समस्या राहत नाही अशा स्वरूपाची भूमिका भारताच्या तत्कालीन पंतप्रधान

---

मन ओळखणाऱ्यांपेक्षा मन जपणारी माणसं हवीत. कारण ओळख ही क्षणभरासाठी असते, तर जपवणूक आयुष्यभरासाठी.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतली व त्यांनी पाकिस्तानने भारतावर हवाई हल्ला केल्यानंतर खऱ्या अर्थाने भारताच्या सेनेला पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले. यातूनच ३ डिसेंबर १९७१ रोजी दुसऱ्या भारत-पाक युद्धाची सुरुवात झाली. भारताने पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानात चालविलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनास दिलेले हे योग्य ते नैतिक उत्तर होते. या युद्धातदेखील चीन तसेच अमेरिका पाकिस्तानच्या मदतीला धावून येईल असे पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना वाटत होते. पाकिस्तानी नेत्यांना विश्वास होता की, उत्तरेकडून (अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, त्रिपूरा ही राज्ये ओलांडून) पिवळी सेना म्हणजेच चिनी सेना पूर्व पाकिस्तानात पाकिस्तानी लष्कराच्या मदतीला धावून येईल. त्याचप्रमाणे दक्षिणेकडून म्हणजेच बंगालच्या उपसागरातून/मार्गे गोरी सेना म्हणजेच अमेरिकन नौदल पूर्व पाकिस्तानात पाकिस्तानच्या लष्कराला सर्वोतोपरी रसद पुरविण्याचे काम करील. परंतु पाकिस्तानची ही इच्छा शेवटपर्यंत पूर्ण झाली नाही, पाकिस्तानच्या मदतीला पिवळे (चिनी) वा गोरे (अमेरिकन) धावून आले नाहीत. मात्र, भारतीय लष्कराने पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान अशा दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानच्या लष्कराला पाणी पाजले; नव्हे पाकिस्तानचा लष्करी डोलारा भारतीय जवानांच्या वादळापुढे पत्त्यांप्रमाणे कोसळला. सत्याचा असत्यावर विजय झाला व भारताने पाकिस्तानला निर्णायकरित्या पराभूत केले. एवढे होऊन देखील भारताने संयम दाखवून पाकिस्तानच्या एक इंच जमिनालाही ताब्यात घेण्याचा मोह टाळला. या युद्धात भारत तर विजयी झालाच परंतु पूर्व पाकिस्तान स्वतंत्र होऊन बांग्लादेश नामक नवीन स्वतंत्र व सार्वभौम देश निर्माण झाला. या युद्धातील पराभवामुळे व प्रामुख्याने बांग्लादेशाच्या निर्मितीमुळे पाकिस्तान खूप चिडला व त्याच्या असेही लक्षात आले की, पाकिस्तानने कितीही आदळआपट केली तरी पाकिस्तान भारताला युद्धभूमीवर पराभव करू शकत नाही. त्यामुळेच नंतरच्या काळात पाकिस्तानात सत्तेवर आलेले लष्करशहा झिया-उल-हक यांनी भारताविरुद्ध छुपे युद्ध लढण्यास (अर्थात आतंकवाद्यांच्या मदतीने) प्राधान्य दिल्याचे निदर्शनास येते व त्याची झळ आपणास आजतागायतपर्यंत बसत आहे.

चीन व पाकिस्तानचे साटेलोटे फक्त आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताविरुद्ध राजकारण करण्यापर्यंत व भारताला विविध मुद्यांवर असहकार करेपर्यंतच स्तिमित असते तर वेगळी गोष्ट होती. परंतु चीनने अवैधरित्या व छुप्यारितीने पाकिस्तानला शस्त्रास्त्र पुरवठा करून आतंकवादाला खतपाणी घालणाऱ्या भस्मासूराला पोसण्याचे पाप केले आहे. ही बाब तेव्हा फार गंभीर होते, जेव्हा या दोन देशांमध्ये अणुबाँब (मानवी इतिहासातील अतिशय संहारक शस्त्र) बनविण्यासाठी अवैधरित्या तंत्रज्ञानाची व इतर गोष्टींची देवाण-घेवाण केली जाते. चीन व पाकिस्तानने एकामेकांना एकमेकांसाठी अणुबाँब बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सर्व आंतरराष्ट्रीय नियम धाब्यावर बसवून मदत केल्याचे आता उघड झाले आहे. पाकिस्तानचा अण्वस्त्र शास्त्रज्ञ अब्दुल कादिर खान याने अणुबाँब व अणुऊर्जेबाबतचे तंत्रज्ञान आपल्या नेदरलँडस् या युरोपीयन देशाच्या वास्तव्यात असताना चोरल्याचे आता सिद्ध झाले आहे. त्याने हे पाश्चिमात्य चौर्य करून इस्लामबादच्या नजीक आपली अण्वस्त्र निर्मितीची प्रयोगशाळा थाटली व 'रिव्हर्स इंजिनियरिंगचा' वापर करून तसेच चीनी तज्ज्ञांची देखील मदत घेऊन पाकिस्तानचा अण्वस्त्र कार्यक्रम सुरू ठेवला. यात चौर्य केलेल्या तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण दोन्ही बाजूंकडून (चीन व पाकिस्तान) होत होती. याचा परिणाम म्हणजे सुरुवातीस चीन अण्वस्त्रधारी (अणुबाँब बनवणारा) व त्यानंतर १९९८-९९ साली (चीनच्या मदतीने) पाकिस्तानदेखील अण्वस्त्रधारी देश बनला.

---

कुणावाचून कुणाचे काहीच अडत नाही हे जरी खरे असले, तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही,
डोकं शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत, अन् भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत.

आज चीनने मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रगती केली आहे. त्याचे श्रेय माओ-त्से-तुंगनंतर सत्तेत आलेल्या देंग-जाऊ-पिंग या नेत्यास जाते. देंगने चीनमध्ये उदार आर्थिक धोरणाची सुरुवात केली व आज चीन त्याची गोड फळे चाखत आहे. चीनच्या या आर्थिक प्रगतीला निदान सन २००० पर्यंत तरी अमेरिकेने मोठा हातभार लावलेला होता. चीन साम्यवादी झाल्यानंतर अमेरिका व चीनमधून विस्तव देखील जात नव्हता. परंतु रिचर्ड निक्सन (कार्यकाल १९६९-१९७४) हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी अमेरिका-चीन संबंध सुधारण्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली. निक्सन यांना या कामी त्यांचे परराष्ट्र मंत्री हेन्री किसिंगर यांनी खूप मदत केली. हेन्री किसिंगर हे चीनमध्ये साम्यवादी सत्ता स्थापन झाल्यानंतर त्या देशाला भेट देणारे अमेरिकेचे पहिले परराष्ट्र मंत्री ठरले. अर्थात, हेन्री किसिंगर यांच्या चीन प्रवासाविषयी खूप मोठ्या प्रमाणात गुप्तता बाळगण्यात आली होती व ही भेट घडवून आणण्यास चीनचा सर्वात जवळचा व 'सर्वकालीन मित्र' (All Weather Friend) पाकिस्तानने मदत केली होती असे तज्ज्ञांचे मत आहे. रिचर्ड निक्सन व हेन्री किसिंगर यांना त्यावेळेस आपण स्वतः फार मोठे दूरदृष्टी पाऊल उचलत आहोत असे वाटत होते, मात्र प्रत्यक्षात ते तसे करून येणाऱ्या भविष्यकाळात स्वतःला फार मोठा स्पर्धक निर्माण करत आहेत याची त्यांना थोडीही जाणीव नव्हती. निक्सन व किसिंगर यांनी अमेरिका-चीन सुसंबंधांचा पाया घातला असे म्हणणे वावगे ठरू नये. नंतरच्या येणाऱ्या काळात अमेरिकेच्या प्रत्येक राष्ट्राध्यक्षाच्या कारकीर्दीत हे संबंध/वृद्धिंगतच होत गेल्याचे निदर्शनास येते (निदान आर्थिक संबंध तरी). या दोन देशांच्या संबंधात चढ-उतार वा काहीवेळा काही बाबींवरून तणाव देखील निर्माण झाला. परंतु चीनला अमेरिकेच्या संपर्कात आल्यामुळे उत्तरोत्तर आर्थिक फायदाच झाल्याचे आपल्या लक्षात येते. सध्या चीन ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. चीनने आर्थिक प्रगतीच्या बाबतीत आपला शेजारी व पारंपरिक स्पर्धक जपानला देखील मागे टाकले आहे. चीनचा हा आर्थिक भस्मासूर निर्माण करण्याचे श्रेय कुठे ना कुठे अमेरिकेला देखील जाते. सद्यस्थितीत समाधानाची बाब ही की, अमेरिकेला चीनचे खरे आसुरी रूप कळू लागले आहे. हेच कारण आहे की, २० व्या शतकाच्या शेवटच्या काही वर्षांपासून म्हणजेच बिल क्लिंटन यांच्या दुसऱ्या वेळच्या प्रशासनाच्या वा राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दीच्या शेवटच्या काही काळापासून ते आजतागायत अमेरिका-भारत संबंध पूर्वीपेक्षा फारच जास्त प्रमाणात सुधारत गेल्याचे चित्र दिसते. बिल क्लिंटन नंतर राष्ट्राध्यक्ष झालेल्या जॉर्ज बुश ज्यूनियर, बराक ओबामा व सध्याचे डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात देखील भारत-अमेरिकेसंबंध सदृढ झाल्याचेच सर्वसामान्य चित्र समोर येते. अर्थात काही मुद्यांवर भारत व अमेरिकेत मतभेद होते, आहेत व राहणारच, हा तर परराष्ट्र नीतीचा भागच झाला. मात्र, सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकेला दक्षिण आशिया व एकंदरीतच आशिया खंडातील अर्थकारणातील व राजकारणातील घडामोडींबाबत भारताचे स्थान महत्त्वाचे आहे हे मान्य करावे लागले आहे. नेमके हेच चीनचे दुखणे आहे. अटलबिहारी वाजपेयी व डॉ. मनमोहन सिंग या दोन पंतप्रधानांच्या काळात तर अनुक्रमे अण्वस्त्र व प्रामुख्याने अणुऊर्जा याबाबतीत अमेरिकेलाच नव्हे तर संपूर्ण जगाला भारताची भूमिका मान्य करावी लागली. ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. श्री. नरेंद्र मोदी यांच्या काळातदेखील भारताचे एकंदरीतच जगाच्या राजकारणातील व अर्थकारणातील भारताचे अढळ स्थान निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. येथे आपण हेन्री किसिंगर यांचा उल्लेख केला. किसिंगर महाशय एकदा चिनी नेत्यांसोबत हास्यविनोद करताना म्हणाले होते की, भारताला वेसण वा आवर घालण्याचा उत्तम

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात त्यांच्याशीही प्रेमानंच वागलं पाहिजे;
ते चांगले आहेत म्हणून नाही, तर तुम्ही चांगले आहात म्हणून!

उपाय म्हणजे पाकिस्तान व बांग्लादेशला अण्वस्त्रधारी बनविणे होय. किसिंगर व रिचर्ड निक्सन भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचादेखील द्वेष करत. निक्सन यांनी तर श्रीमती गांधींचा उल्लेख एकदा चेटकीण (witch) असा केला होता. हा झाला भूतकाळ, सद्यस्थितीत अमेरिकेला भारताच्या जगाच्या राजकारणातील महत्त्वाची प्रचीती आली आहे.

आपण चीनने त्यांच्या वायव्येकडील क्षिनजियांग Xinjiang प्रांतातील उयघुर (Uighur) मुस्लिमांवर चालविलेल्या दडपशाहीवर अगोदर प्रकाश टाकलेलाच आहे. येथील उयघुर या मुस्लिम बांधवांना जगाच्या पाठीवर कोठेही होत नसेल एवढ्या जुलमी राजवटीला व दडपशाहीला तोंड द्यावे लागत आहे. यातूनच तेथील काही तरुण दहशतवादाकडे झुकत असल्याचे निदर्शनास येते. ही बाब भविष्यात चीनला त्रासदायक ठरणार यात वाद नाही. परंतु सध्यातरी चीन जगाच्या पाठीवर सर्वात जास्त प्रमाणात दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तान नामक देशाला भारताविरोधात जाणिवपूर्वक मदत देताना दिसत आहे. क्षिनजियांग या प्रांतातून तर अगोदर उल्लेखिल्याप्रमाणे चीनने 'चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडॉर' नामक महाभयंकर प्रकल्प हाती घेतला आहे. नेमक्या याच महामार्गांवरून पाकिस्तानातील दहशतवादी भविष्यात चीनमध्ये प्रवेशकर्ते न झाले तर चीनचे सुदैव मानावे लागेल. चीनला याची पूर्णतः जाणीव आहे की, पाकिस्तानच्या सैन्यातील उच्च पदस्थ अधिकारी जरी उंची राहणीमान व उंची मद्याचे शौकीन असले तरी पाक लष्करातील मध्यम व निम्न स्तरातील अधिकारी हे दहशतवाद्यांविषयी सहानुभूती बाळगून आहेत. पाकिस्तानची गुप्तचर संघटना 'इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स' - आय्.एस्.आय. हिचा पाकिस्तानात दहशतवादी संघटनांना सर्वोतोपरी मदत करण्याचा खाक्या तर सर्वज्ञातच आहे. चीनला पाकिस्तानकडून याबाबतीत असलेला धोका सध्यातरी चीनी नेत्यांच्या लक्षात येत नाहीये हेच कटूसत्य आहे.

चीन व पाकिस्तान एकमेकांच्या मित्रत्वाच्या कितीही आणाभाका घेत असले तरी, त्यांच्या या मैत्रीचा एकमेकांना व प्रामुख्याने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात व्यापारी व त्या अनुषंगाने आर्थिक फायदा होत असल्याचे सध्यातरी निदर्शनास येत नाही. याउलट चीन ज्या भारताला स्वतःचा शत्रू मानतो तो भारतच पाकिस्तानच्या तुलनेत चीनसोबत मोठ्या प्रमाणात व्यापार करतो ही बाब लक्षात येते. भारताने दक्षिण आशियातील राजकीय व भौगोलिक क्षेत्रातील चीनच्या उठाबशी वा नसते उपद्व्याप पाहून देखील त्याकडे दुर्लक्ष करून चीनसोबत चांगले संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला. ही गोष्ट भारताचे मोठेपण दर्शविणारी आहे. १९८८ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी चीनला भेट दिल्यापासून पुन्हा एकदा भारताची खऱ्या अर्थाने चीन सोबतची चर्चेची द्वारे /कवाडे उघडली गेली असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.

चीनच्या परराष्ट्रीय धोरणाचे एकंदरीतच वैशिष्ट्य म्हणजे आपल्या शेजारील राष्ट्रांना त्रास देणे हे होय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळेच दक्षिण कोरिया, म्यानमार, फिनिपाईन्स, इंडोनशिया, जपान आदी राष्ट्रांना चीन म्हणजे डोकेदुखी वाटतो यात वाद नाही. उत्तर कोरिया जरी तथाकथीत 'साम्यवादी' राष्ट्र असला तरी त्याला चीनचे नेतृत्व पूर्णतः मान्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अशा या परिस्थितीत पाकिस्तान मात्र स्वतःला सर्वोतोपरी चीनच्या दावणीला बांधून घेण्यात मग्न आहे हे जाणवते. त्यामुळेच विनोदाने असे म्हटले जाते की, पाकिस्तान ईस्ट इंडिया कंपनीच्या गुलामीतून तर मुक्त झाला परंतु चीनच्या गुलामीत रममाण झाला आहे!

'चायना पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडॉर' या

प्रकल्पाचा एक भाग म्हणून चीनने बलुचिस्तानातील ग्वादार हे बंदर विकसीत केले आहे. यामागचा उद्देश असा की, क्षिनजियांग प्रांतातून चिनी माल या प्रकल्पांतर्गत बांधलेल्या लोहमार्ग व महामार्गांवरून ग्वादार बंदरात आणणे व तेथून मध्य आशिया व आफ्रिकेला निर्यात करणे हा होय. ग्वादारमधून अफगाणिस्तानात देखील चिनी माल पाठविण्याचे चीनचे मनसुबे आहेत. परंतु सध्यातरी ते फळाला आले नसल्याचे दिसते. याउलट ग्वादारला लागूनच ईराणमध्ये भारताने चबाहार (Chabahar) बंदर विकसित केले आहे व येथून अफगाणिस्तानात माल नेणे जास्त सुकर असल्याची बाब लक्षात आली आहे व ही गोष्ट चीनला डाचत आहे. येथे बलुचिस्तानचा उल्लेख झाला म्हणून एक बाब निदर्शनास आणून द्याविशी वाटते व ती अशी की, बलुचिस्तानमधील जनता पाकिस्तानवर नाराज असून त्यांना आपले स्वतंत्र राष्ट्र हवे आहे. पाकिस्तानी लष्कर व गुप्तचर संघटना बलुचिस्तानात दररोज अनेक निरपराध बलुची तरुणांचे व नागरिकांचे बळी घेत आहे ही बाब आता लपून राहिलेली नाही. त्यामुळेच चीन व पाकिस्तानच्या एकंदरीतच ग्वादार बंदर विकसित करण्याच्या व तेथून नैसर्गिक वायुच्या पाईप लाईन चीनमध्ये नेण्याच्या प्रयत्नांवर निसार बलूच या बलुचिस्तानी नेत्याने खालील टिप्पणी केली होती, ती वाचकांसाठी मूळ इंग्रजीत जशीच्या तशी 'द चायना पाकिस्तान ॲक्सीस एशियाज् न्यू जियोपॉलिटिक्स' (The China Pakistan Axis Asia's New Geopolitics) या अँड्र्यू स्मॉल (Andrew Small) लिखित पुस्तकातून उद्धृत करत आहोत.(पृष्ठ क्रमांक - ९३)

"No matter how hard they try to turn Gwadar into Dubai, it won't work. There will be resistance. The future pipelines going to China will not be safe. The pipelines will have to cross our Baluch territory and if our rights are violated, nothing will be secure." - Nisar Baluch, General Secretary, Baluch Welfare Society.

नुकतीच (सप्टेंबर २०१९ मध्ये) चीनचे परराष्ट्र मंत्री वँग यी (Wang Yi) यांनी पाकिस्तानला भेट दिली होती. या भेटीदरम्यान त्यांनी भारताने जम्मू-काश्मीर मधून हटवलेले घटनेचे ३७० कलम व एकंदरीतच भारताच्या काश्मीरविषयक धोरणाविरोधात टिप्पणी केली होती असे निदर्शनास येते. तसेच त्यांनी काश्मीरविषयक बाबींवर चीनचा पाकिस्तानला पाठिंबा दर्शविला होता. भारताने मात्र लागलीच वँग यी यांच्या या वक्तव्याची खबर घेऊन चीनविरुद्ध आपली नाराजगी, नव्हे निषेध नोंदविला होता. भारताचे सध्याचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे भारताचे माजी परराष्ट्र सचिव होते व ते चीनला चांगलेच ओळखून आहेत ही भारताच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

नजीकच्या काळात चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षि जिनजिंग भारताच्या भेटीला येणार आहेत. ही त्यांची भेट यशस्वी ठरून दोन्ही बाजूंकडून चांगले निर्णय झाले तर भारत व चीनच्या दृष्टीने चांगलेच आहे. परंतु प्रत्यक्षात काय होईल हे भेट झाल्यानंतरच कळेल. चीनचे सध्याचे पंतप्रधान लि केकियांग (Li Kequiang) यांनी २०१३ साली एक टिप्पणी केली होती. सदर इंग्रजीतील टिप्पणी खाली उद्धृत करीत आहोत,

"No Country can choose its neighbours, and a distant relative may not be as helpful as a near neighbour. China and India should not seek co-operation from afar with a ready partner at hand."

('द चायना पाकिस्तान ॲक्सीस एशियाज् न्यू जियोपॉलिटिक्स' - लेखक - अँड्र्यू स्मॉल, पृष्ठ क्रमांक - ४७)

वरील टिप्पणीचा ढोबळमानाने मराठीत असा अनुवाद होईल की, कुठलाही देश आपला शेजारी

(पृष्ठ क्र.१३ वर)

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

(भाग–७)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

**''स्वस्तिक नगर''**

या नगराचे नियोजन नऊ टप्प्यांत केले जाते. या नगराच्या बाहेर चारही दिशांना जाणारे रस्ते एकाच रुंदीचे केले जातात. या नगरांत पूर्वेकडे जाणारा रस्ता उत्तरेकडून येतो. या रस्त्याला पूर्वेकडील रस्ता असे मानले जाते. हा रस्ता जेथे संपतो तेथे दुसरा रस्ता दक्षिणपूर्व भागाकडून निघतो आणि पश्चिमेकडे जातो. या रस्त्याला दक्षिणरस्ता असे मानले जाते. अशा प्रकारे चार रस्ते एकसारख्या रुंदीचे झाल्याने या नगराला स्वस्तिकाचा आकार येतो.

आता 'प्रस्तर' नगराची माहिती देण्यात येत आहे.
प्राक्प्रत्यग्गमार्गैस्त्रिभिरुद गग्रैस्त्रिभिश्चतुर्भिरथो ।
पञ्चभिरपी षट्सप्तभिरपि युक्तं पञ्च ।।४६।।

प्रस्तर ग्रामाची रचना त्यांतील रस्त्यांच्या आखणीनुसार पाच प्रकारे करता येते. पूर्व पश्चिम तीन रस्ते आणि तीन, चार, पाच, सहा आणि सात रस्तेसुद्धा उत्तरदिशेकडून आखता येतात.

प्रागग्रैस्तु चतुर्भिर्द्वादश शिवपङ्क्तिनन्दवसुमार्गैः।
उदगग्रेभियुक्तं ह्येतम् प्रोक्तं प्रकीर्णकं पञ्च ।।४७।।

ज्या नगरांत चार रस्ते पूर्व–पश्चिम असे आखले गेले आहेत आणि त्याचप्रमाणे बारा, अकरा (शिव), दहा (पङ्क्ति), नऊ (नन्द), आठ (वसु) रस्ते उत्तरेकडून आखले गेले आहेत. अशा नगराला 'प्रकीर्णक' असे संबोधण्यात येते. या नगराची आखणी ही पाच विविध प्रकारे आखता येते.

**नन्द्यावर्त**

प्राक्प्रत्यग्गतमार्गैः पञ्चभिरुदगग्रैस्त्रयोदशभिः ।
द्विसप्तितिरथ तिथिभिः षोडशभिः सप्तदशभिरपि मार्गैः ।।४७।।

ज्या नगरांत पाच रस्ते पूर्व–पश्चिम असे आखले गेले आहेत आणि तेरा, चौदा, पंधरा (तिथी) सोळा आणि सतरा रस्तेसुद्धा आखले गेले आहेत. अशा नगराला 'नन्धावर्त' असे संबोधले जाते.

आद्यैरष्टादशभिर्वा विंशत्यङगकैरुदग्ववक्त्रै ।
षड्भिः प्राङ्मुखमार्गैः ह्येतत्परागभिति कथितम् ।।

ज्या नगराला अठरा ते वीस रस्ते उत्तरेकडे जाण्यासाठी योजले आहेत आणि ज्या नगरांत सहा रस्ते पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी योजले आहेत, त्या नगराला 'पराग' असे संबोधण्यात येते.

**'पद्मक नगर'**

प्राक्प्रत्यग्गतमार्गैः सप्तभिरुदगग्रैस्त्रिवेदशरैः ।
षट्सप्तभिरपि युक्तैर्विंशतिभिः पञ्चधा पद्मक् ।।५१।।

ज्या नगरात पूर्व भागाकडून पश्चिम भागाकडे जाण्यासाठी सात रस्त्यांची योजना केली आहे आणि दोन, तीन, चार (वेद), पाच (शर–भात्यात पाच बाण असतात), सहा किंवा सात रस्ते उत्तरभागाकडे जाण्यासाठी योजले आहेत ते नगर 'पद्मक' या नांवाने संबोधले जाते. वा नगराच्या योजनेत वीस रस्ते समांतर आखले जातात.

'नाही' हा शब्द तुम्हाला ऐकू येत नाही, तोपर्यंत सगळे काही शक्य आहे!

अष्टभिरथ पूर्वाग्रैरुदगग्रैः साष्टविंशतिभिः ।।५२।।

आद्यैर्द्विषोडशभिर्मार्गगैरन्तैर्युतं यत्तु ।
तच्छ्रीप्रतिष्ठितं स्यादष्टविधं ग्राममुद्दिष्टम् ।।५३।।

ज्या नगरांत आठ रस्ते पूर्वेकडून निघतात आणि २८ ते ३२ रस्ते उत्तरेकडून तयार केले जातात ते नगर 'श्री प्रतिष्ठित' या नांवाने ओळखले जाते.

आतापर्यंत वेगवेगळया नगरांच्या रस्ते बांधण्यासंदर्भातील वैशिष्ट्ये यामुळे त्यांचे वेगळेपण दाखविणाऱ्या आठ प्रकारच्या नगरांचे वर्णन केले आहे. ती नगरे अशी;

क्षुद्रग्रामे मार्गाश्चत्वारः चाष्ट मध्यमे ग्रामे
द्वादश षोडश मार्गा ग्रामेषूत्कृष्टेतु मताः ।।५६।।

नगरांच्या रस्त्यांच्या योजने संबंधांतील काही महत्त्वाचे निकष सुचवल आहेत ते असे – ज्या गांवात चार रस्ते आहेत ते कनिष्ठ दर्जाजे मानले जाते, ज्या नगरात आठ रस्ते आहेत ते मध्यम दर्जाचे मानले जाते आणि १२ ते १६ रस्ते असलेले गांव उत्कृष्ट मानले जाते.

**दशमोऽध्यायः**

प्राक्प्रत्यग्गतमार्गा द्वादश वा षट्चतुर्युगलम् ।
तावदुदीचीनास्ते तत्रैवायुग्मसंख्यया वा ।।५४।।

सर्वसाधारणतः रस्त्यांची आखणी पूर्वेकडून पश्चिमेकडे जाता येईल अशा पद्धतीने करावी. असे रस्ते दोन, चार, सहा, आठ, दहा किंवा बारासुद्धा योजावेत. अशाच पद्धतीने उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्यांची योजना करावी.

नगरादीनामेवं मार्गाप्युहितानि सर्वेषाम् ।
दण्डवदेका वीथी तद्दण्डकमित्यभीष्टं स्यात् ।।५४।।

आता 'नगर' या ग्रामातील रस्ते. एकच सरळ रस्ता आणि भूमी समतल असेल तर तो रस्ता दण्डक या नांवाने ओळखला जातो.

उत्तरादिङ्मुखमेकं तन्मध्ये सम्प्रयुक्तं चेत् ।
कर्तरिदण्डमुदितं प्राचीनौ कुक्षिनौ तर्हि ।।५५।।

तद्बाहुदण्डकं स्याद्दिक्षु चतुर्द्वारसंयुतम् ।
बहुकुक्षिमसंयुक्तं मध्ये वीथ्या द्विपार्श्वे तु ।।५६।।

शेषं पूर्ववद्दिष्टं कुक्षिकामुखदण्डकं प्रोक्तम् ।

वर उल्लेख केलेला 'दण्डक' रस्ता गावाच्या मध्यभागाच्या उत्तरेकडून येणाऱ्या रस्त्याला मिळत असेल तर त्याला 'कर्तरीदण्ड' असे संबोधले जाते. त्याचप्रमाणे पूर्वेकडून दोन समांतर रस्ते येत असल्यास त्यांना 'बाहूदण्डक' असे संबोधले जाते. आणि हे रस्ते मुख्य रस्त्याच्या चारही बाजूच्या प्रवेशद्वारापर्यंत जात असतील तर अशा तऱ्हेच्या रस्त्यांच्या रचनेला 'कुक्षिकामुखदण्डकं' असे संबोधले जाते.

प्राचीनोदीचीनैर्मार्गैस्त्रिभिरेव संयुक्तम् ।
तत्कलकाबन्धदण्डमिति तज्ज्ञैः संबोधितम् ।।५७।।

पूर्वेकडून आणि उत्तरेकडून येणारे तीन तीन रस्ते जेथे मिळतात, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंकडून मिळणाऱ्या मध्यभागांतील प्रदेशाला 'कलकामुखदण्डक' असे जाणकार म्हणतात.

प्राङमुखवीथ्यस्त्रिश्चोत्तरमार्गाश्त्रश्चैव ।।५८।।
एकैकान्तरितास्ते कुक्षिममार्गास्त्वनेकाश्च ।
वेदिभद्रकमुदितं नगरादीनामिदं शस्तम् ।।५९।।

पूर्वेकडून येणाऱ्या तीन रस्त्यांना एक कमी रुंदीचा रस्ता छेदून जात असेल आणि ते तीनही रस्ते चुनखडीने पक्के केले असतील तर अशा रस्तेबांधणीला 'वेदिभद्रक' असे म्हटले जाते. अशी व्यवस्था लहान गांवात अधिक उपयुक्त ठरते.

**– मधुकर गजानन दातार**

●●●

छत्री पावसाला थांबवू शकत नाही; पण पावसात थांबण्याचे धाडस नक्की देऊ शकते; तसेच आत्मविश्वास यशस्वी होण्याची खात्री देऊ शकत नाही पण संघर्ष करण्याची प्रेरणा नक्की देऊ शकतो.

# NI - सुधारणा विधेयक का महत्वाचे ?

*भारताला असणारा दहशतवादाचा धोका हा आज केवळ पाकिस्तानशी संबंधित किंवा पाकपुरस्कृत दहशतवादापुरता मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्तरावरील विघातक शक्तींपासूनही आहे. अलीकडील काळात दहशतवाद्यांकडून सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर होत आहे. याखेरीज, मानवी तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, अंमली पदार्थांचा चोरटा व्यापार छुप्या मार्गाने सुरू आहे. या सर्वांचा सामना करण्यास राष्ट्रीय तपास संस्थेला (National Investigation Agency-NIA)असणाऱ्या मर्यादा लक्षात घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्यासंदर्भातील सुधारित विधेयक लोकसभेत मंजूर झाले असले तरी त्यावरून बरेच राजकारणही होताना दिसले. वास्तविक राष्ट्रीय सुरक्षेसाठी गरजेच्या असणाऱ्या या विषयाला राजकारणापासून दूर ठेवणे हेच देशहिताचे आहे. यावर प्रकाश टाकणारा डॉ. शैलेंद्र देवळाणकर, परराष्ट्र धोरण विश्लेषक यांचा लेख - संपादक*

नुकतेच लोकसभेमध्ये NIA मध्ये सुधारणा करण्याबाबतचे एक विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक मंजूर करताना ज्या प्रकारची चर्चा लोकसभेत झाली त्यावरून नॅशनल इनव्हेस्टिगेशन एजन्सी (एनआयए) अर्थात राष्ट्रीय तपास संस्था या महत्त्वपूर्ण संस्थेचे राजकियीकरण करण्याचा प्रयत्न होतो आहे असे दिसते आहे.

वास्तविक, ज्या संस्था किंवा संघटना देशाच्या सुरक्षेशी निगडित आहेत, किंबहुना ज्यांच्यावर दहशतवादाचा सामना करून देशातील सामान्य माणसाच्या रक्षणाची जबाबदारी आहे अशा संस्थांकडे तरी पक्षीय राजकारणाच्या दृष्टीने पाहिले जाऊ नये. पक्षीय किंवा संकुचित राजकीय हितसंबंधांच्या पुढे जाऊन त्यासंदर्भात विचार करणे गरजेचे आहे. दुर्दैवाने, हे सुधारणा विधेयक संमत होताना तसे झालेले नाही.

## NIA सुधारणा विधेयक का महत्त्वाचे ?

खरे पाहता, या सुधारणेमुळे राष्ट्रीय तपास संस्थेचे सबलीकरण होणार आहे. ही सुधारणा करणे काळाची गरज होती. कारण गेल्या दहा वर्षात देशातील दहशतवादाच्या समस्येचे स्वरूप बदलले आहे. काही काळापर्यंत ही समस्या जम्मू काश्मीरपर्यंत मर्यादित होती; पण आता तिचा धोका संपूर्ण देशाला निर्माण झालेला आहे. आज भारताला केवळ पाकपुरस्कृत दहशतवादाचा आणि इतर सीमाभागांतून येणाऱ्या घुसखोरांचाच धोका राहिलेला नाही; तर आयसिस, अल् कायदा यांसारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांचे टार्गेट भारत आहे. काश्मीरमध्ये अनेकदा आयसिसचे झेंडे फडकावले गेले आहेत. तसेच आयसिसच्या मूलतत्त्ववादी प्रचाराला भुलून थेट या संघटनेत अनेक भारतीय तरुण सामील झाल्याचेही मागील काळात दिसून आले आहे. दुसरीकडे अल् कायदाचा म्होरक्या अल जवाहिरी याची एक व्हिडिओ टेप नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. त्यामध्ये जवाहिरी याने भारताला उघड धमकी दिली आहे. काही महिन्यांपूर्वी श्रीलंकेत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात ३०० हून अधिक निष्पाप लोकांचे बळी गेले. या स्फोटांशी संबंधित असणाऱ्या तौहिद जमात या संघटनेचे कार्यालय भारतातही असल्याचे एनआयएच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या संघटनेची आयसिसशी बांधिलकी आहे, हे याठिकाणी लक्षात घ्यायला हवे. यावरून भारताला असणारा दहशतवादाचा धोका हा केवळ पाकिस्तानशी संबंधित किंवा पाकपुरस्कृत

तुम्ही गरीब म्हणून जन्माला आलात यात तुमचा काहीच दोष नाही, पण जर तुम्ही गरीब म्हणून मेलात तर हा नक्कीच तुमचा दोष असेल.

दहशतवादापुरता मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्तरावरील विघातक शक्तींपासूनही आहे हे लक्षात घ्यायला हवे.

आयसिस या संघटनेने आता पश्चिम आशियाकडून दक्षिण आशियाकडे लक्ष केंद्रित केले आहे. सोशल मिडियाच्या माध्यमातून या संघटनांना फैलाव होतो आहे. या प्रकारच्या दहशतवादाचा सामना करायचा असेल तर एनआयएचे सबलीकरण करणे भाग होते.

### दहशतवाद निर्मूलनासाठी राष्ट्रीय कायदा नाही

आज भारतामध्ये दहशतवादाचे निर्मूलन करण्याचा राष्ट्रीय पातळीवरील कायदा अस्तित्त्वात नाही. अमेरिकेमध्ये होमलँड सिक्युरिटी ॲक्ट आहे. भारतात पूर्वी टाडा नावाचा कायदा अस्तित्वात होता; पण आता तो नाही. २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा कट परदेशात रचण्यात आल्याचे समोर आले. त्यावरून दहशतवाद हा एका विशिष्ट राज्यापुरता मर्यादित राहिलेला नाही आणि तो संपूर्ण भारतात पसरलेला असल्याने त्याचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरच्या संस्थेची गरजही प्रकर्षाने समोर आली.

### अंतर्गत सुरक्षेसाठी प्रयत्न

मुंबईवरील हल्ल्यानंतर तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी भारताची अंतर्गत सुरक्षा प्रभावी करण्यासाठी काही निर्णय घेण्यात आले. त्यातील दोन सुधारणा या अत्यंत महत्त्वाच्या होत्या. एक म्हणजे एनआयएची स्थापना आणि दुसरी होती नॅशनल काऊंटर टेररिझमची स्थापना. त्याचप्रमाणे भारतातील सर्व पोलिस स्थानके एकमेकांशी जोडण्याचा निर्णयही घेण्यात आला. या तीनपैकी राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्र अस्तित्वात येऊ शकले नाही. कारण त्याला काही राज्यांचा विरोध झाला होता. तथापि, एनआयएच्या स्थापनेची सूचना मात्र मंजूर झाली आणि ही संघटना अस्तित्वात आली.

### NIA ची कामगिरी

२००८ मध्ये भारतीय संसदेने एनआयएच्या निर्मितीसाठी कायदा मंजूर केला आणि २००९ मध्ये राष्ट्रीय तपास संस्था उदयास आली. या संस्थेच्या स्थापनेला दहा वर्ष पूर्ण झाली आहेत. मधल्या काळात एनआयएच्या घटनात्मक वैधतेला न्यायपालिकेत आव्हान दिले गेले; पण उच्च न्यायालयाने त्याच्या वैधतेवर शिक्कामोर्तब केले. सध्या सर्वोच्च न्यायालयात हा खटला प्रलंबित आहे.

गेल्या दहा वर्षात एनआयएने अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. हिज्बुल मुजाहिद्दीन, सिमी यांसारख्या संघटनेची तसेच जम्मू काश्मीरमधील दहशतवादी संघटनांची पाळेमुळे खोदण्यापासून ते दगडफेक करणाऱ्या लोकांना आर्थिक मदत करणाऱ्या देशविघातक घटकांवरही छापे टाकून त्यांची नाकेबंदी करण्यापर्यंत एनआयएला यश आले आहे. अनेक कुख्यात दहशतवाद्यांना पकडण्याचे किंवा त्यांची पाळेमुळे खणून काढण्याचे मोठे कार्य एनआयएने केले आहे.

असे असले तरी दहशतवादाची समस्या अधिक खोल रुजत गेल्यामुळे एनआयएच्या मर्यादाही समोर येऊ लागल्या. त्यामुळे २०१३-२०१४ पासूनच एनआयएमध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा झाल्या पाहिजेत अशी मागणी आणि सूचना पुढे येऊ लागल्या.

### काय आहे सुधारणा विधेयक

अलीकडील काळात दहशतवाद्यांकडून सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर होत आहे. याखेरीज, मानवी तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, अंमली पदार्थांचा चोरटा व्यापार छुप्या मार्गाने सुरू आहे. या गुन्ह्यांचा समावेश एनआयएच्या कार्यकक्षेत येणे आवश्यक ठरले. संसदेत नुकतेच संमत झालेल्या सुधारणा विधेयकामुळे या गुन्ह्यांना एनआयएच्या कार्यकक्षेत आणले जाणार आहे.

---

व्यक्तिमत्त्व सुंदर नसेल तर दिसण्याला काहीच अर्थ नाही. कारण सुंदर दिसण्यात अन् असण्यात खूप फरक असतो.

अनेकदा दहशतवादी संघटना बहुराष्ट्रीय कंपन्यांसारखे काम करतात. त्या दहशतवादी कृत्य एखाद्या देशात करतात, पण त्याचे कारस्थान दुसऱ्या देशात रचले जाते. दहशतवाद्यांची प्रशिक्षण स्थळे अनेक देशांत असतात. पण याबाबत एनआयए काही ठोस पाऊल उचलू शकत नाही. कारण एनआयएला केवळ राष्ट्रीय पातळीवरच तपास करण्याची परवानगी आहे. आताचे सुधारणा विधेयक राज्यसभेत मंजूर होऊन त्याचे कायद्यात रूपांतरीत झाले तर एनआयएला परदेशातही तपास करता येणार आहे. त्यासाठी त्या देशाची परवानगी लागणार आहे. पण एनआयए स्वतःचे स्वतंत्र लवाद उभे करू शकते असे या कायद्यात म्हटले आहे. त्यानुसार शिक्षा देण्याचे अधिकारही एनआयएला असणार आहेत.

या विधेयकात आणखी काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्या संमत झाल्यास गुन्ह्यांचा तपास, गुन्हेगारांविरुद्ध खटला चालवण्याची प्रक्रिया आणि दोषींविरुद्ध निर्णय घेणे या तीनही पद्धतींचे कार्य करता येणार आहे. तसे पाहिले तर ह्या सुधारणा विधेयकातून एनआयएला फार मोठे विशेषाधिकार दिलेले नाहीत. केवळ पूर्वीच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यानुरूप अधिक चांगल्या प्रकारे काम करता यावे या दृष्टीकोनातून छोटे मोठे बदल करण्यात आले आहेत. असे असताना याविरुद्ध अकारण राजकारण करून त्याचा बागुलबुवा केला जात आहे. या सुधारणांमुळे देशात पोलिस राज निर्माण होईल, अशी भीती निर्माण केली जात आहे. ती पूर्णतः चुकीची आहे. अमेरिकेत होमलँड सिक्युरिटी एजन्सी आहे तशीच ही देखील होमलँड सिक्युरिटी एजन्सी आहे असे मानून यावर टीका केली जात आहे; पण हा समज चुकीचा आहे. याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही स्पष्टीकरण दिलेले आहे. एनआयएचा मुख्य उद्देश दहशतवादाचे समूळ निर्मूलन करणे हा असून तेच कार्य सक्षमपणाने करता यावे यासाठी या तरतुदी आहेत. त्यातून कोणत्याही पद्धतीचे राजकारण करण्याची सरकारची भूमिका नाही.

**दहशतवाद कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न नाही**

एनआयएच्या सुधारणा विधेयकाला विरोध करणाऱ्यांनी एक तांत्रिक प्रश्न उपस्थित केला आहे. कायदा आणि सुव्यवस्था आणि गुन्ह्याचा तपास हा राज्यसुचीतील म्हणजे राज्याच्या अखत्यारीतील विषय आहे. पण एनआयएसारखी संस्था तयार करताना राज्यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये हस्तक्षेप होतो असे त्यांचे म्हणणे आहे. पण आजघडीला दहशतवादाच्या समस्येकडे केवळ कायदा सुव्यवस्थेची समस्या या दृष्टीने पाहणे उपयोगी नाही. कारण गेल्या काही वर्षात दहशतवादाचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे ती कायदा-सुव्यवस्थेच्या समस्येपलीकडे गेली आहे. ती राष्ट्रीय आणीबाणी निर्माण करणारी समस्या झाली आहे. दहशतवादी कृत्ये हा देशाविरुद्ध कट रचून केली जात आहेत. त्याचा धोका संपूर्ण राष्ट्राला निर्माण झाला आहे. त्यामुळे तो केंद्रीय गुन्हा आहे. अशा आक्राळविक्राळ बनलेल्या समस्येचा सामना करण्यास राज्यांना मर्यादा आहेत. राज्यात अँटी टेररिझम स्क्वाड (एटीएस) तयार करण्यात आले आहेत. पण हिज्बुल मुजाहिदीनसारख्या संघटनेची पाळेमुळे भारतातील अनेक राज्यांमध्ये असू शकतात. अशा स्वरूपाचे तपास करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील संस्थेचीच गरज आहे. त्यामुळे दहशतवादाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. आज ज्या देशांना दहशतवादाचा धोका आहे ते बहुसंख्य देश दहशतवादाकडे राष्ट्रीय आपत्ती किंवा राष्ट्रावरील आक्रमण या स्वरूपात पाहातात. त्याचा मुकाबला केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून केला जातो. काही देशात नागरिकांना ओलीस ठेवणे किंवा दहशतवादी हल्ला करणे यांसारखी कृत्ये घडल्यास राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली जाते आणि केंद्रीय फौजांना बोलावले

जाते. भारत हा सातत्याने दहशतवादाला बळी पडणारा देश आहे. तरीही आज आपण दहशतवादाच्या प्रश्नावर राजकारण करतो आणि त्याकडे कायदा सुव्यवस्था या दृष्टीने पाहतो. हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीनेच एनआयएचे सक्षमीकरण करण्यात येत आहे.

**NCTC ची स्थापना गरजेची**

अर्थात केवळ या सबलीकरणाने काम भागणार नाही. भारतात लवकरात लवकर राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्रही स्थापन केले पाहिजे. जेणेकरून या समस्येचा सामना राष्ट्रीय पातळीवर करता येईल. काही विरोधकांना हा राज्याच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप किंवा आक्रमण असे वाटत असले तर काही राज्ये स्वतःहून दहशतवादी हल्ल्यांचा तपास एनआयएकडे सोपवतात, हे आपण पाहिले आहे. तशी तरतूदही आहे; पण २०१६ मध्ये केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह यांच्या कारकिर्दीत एक सूचना आली होती. त्यानुसार राज्यात जाऊन तपास करताना एनआयएला राज्य पोलिस महासंचालकांची पूर्वपरवानगी घ्यावी लागते, ती अट काढून टाकण्यात यावी, असे सूचित करण्यात आले होते; पण त्यावरूनही राजकारण होऊ शकते. वास्तविक, एनआयएला दहशतवादाच्या समस्येसाठी कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याचे अधिकार दिले गेले पाहिजेत. त्यातून ही संस्था प्रभावीपणाने काम करू शकेल आणि त्याचे परिणामही दिसून येतील. आज जम्मू-काश्मीरमध्ये दगडफेकीवर जे नियंत्रण आले आहे ते एनआयएच्या छाप्यांमुळेच आले आहे, हे लक्षात घ्याला हवे.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी - ९७०२०३५८००

(पृष्ठ क्र.७ वरून-**चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी...**)

निवडू शकत नाही, दूर असलेल्या नातेवाईकांपेक्षा जवळ असलेला शेजारीच शेवटी मदतीचा ठरतो. चीन व भारताने देखील दूरच्या (येथे युरोप व अमेरीका वाचणे संयुक्तिक ठरेल) सहकार्यापेक्षा एकमेकांची मदत घेणे संयुक्तिक ठरेल.

लि केकियांग यांचे वरील मत जर खरोखरीच प्रत्यक्षात उतरले व चीन व भारत यांचे संबंध खऱ्या अर्थाने सदृढ झाले व ते एकमेकांचं 'खरे' मित्र झाले तर तो 'सोनियाचा दिन' ठरेल व हे दोन अति प्राचीन सभ्यता व इतिहास असलेले देश संपूर्ण जगावर राज्य गाजवतील यात वाद नाही. सध्या तरी हे स्वप्न वाटते. परंतु स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठीच बघावयाची असतात!

**संदर्भ ग्रंथ :**

चायना : फेयरबँक व गोल्डमन

द चायना - पाकिस्तान ॲक्सीस : अँड्र्यू स्मॉल एशियाज् न्यू जिओपॉलिटिक्स

चायनाज् इंडिया : वॉर : कोलीजन् - बेर्टील लिंन्टर

कोर्स ऑन द रुफ ऑफ द वर्ल्ड

इंडिया टर्न्स ईस्ट इंटरनॅशनल : फ्रेडरिक ग्रेयर एंगेजमेंट अँड यू. एस्.-चायना रायव्हलरी

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

# जपानचा इतिहास

*जपानच्या इतिहासातील महत्त्वाच्या कालखंडावर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

People without the knowledge of history is like tree without roots - Marcus Garvey

प्रत्येक देशाला स्वतःचा असा एक वेगळा इतिहास असतो; ज्यामुळे पुढील पिढीला आपल्या देशाबद्दल अधिक जाणून घेण्यास मदत होते. आपल्या देशात किती घडामोडी घडल्या, कोणत्या राजांनी आपल्या देशावर राज्य केले, युद्धातील विजय आणि पराभव, जुन्या रूढी-परंपरा अशा बऱ्याच गोष्टींची माहिती आपणांस इतिहासामुळे समजते.मागील लेखात मी जपानी भाषा आणि संस्कृती या विषयावर लिहिण्याचा प्रयत्न केला. या लेखात आपण वेगवेगळ्या कालखंडातील जपानचा इतिहास पाहू.

### एदो कालखंड (१६००-१८६८)



एदो कालखंडात तोकुगावा शोगुनाते याच्या कडक नियंत्रणाखाली शांतता व स्थैर्य प्रस्थापित झाले. सामाजिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी तोकुगावा शोगुनाते याने अत्यंत टोकाच्या भूमिका गाठल्या. अगदी किरकोळ गुन्ह्यांसाठीही सुळावर चढवणे, शिरच्छेद करणे, उकळत्या पाण्यात टाकून मारणे अशा शिक्षा त्याने जाहीर केल्या.समाजातील उच्च वर्गातील गुन्हेगारांना त्याने सेप्पुकू हा पर्याय दिला होता. सेप्पुकू (self-disembowelment) हा आत्महत्येचा एक प्राचीन प्रकार होता जो आता सामान्य झालेला आहे. तोकुगावा राज्य करत असतानाच्या पहिल्या शतकात शेतीच्या विकासामुळे जपानची लोकसंख्या दुपटीने ३० दशलक्षांवर गेली. रस्ते तयार करणे, रस्ते व पुलाचे टोल हटवणे आणि नाणे प्रमाणिकरणामुळे व्यावसायिक विस्तारास चालना मिळाली व त्याचा फायदा शहरातील व्यापारी व कारागिरांनाही झाला. अनेक खासगी शाळा, मंदिरे उभारण्यात आली व त्यामुळे जपानच्या साक्षरतेत ३०% वाढ झाली. साक्षरतेतील वाढ हा एदो कालखंडातील सर्वात उल्लेखनीय बदल होता.

### मेईजी कालखंड (१८६८-१९१२)



मेईजी ऑलिगार्ची हा जपानचा १२२ वा सम्राट होता. याच काळात एदोचे नाव बदलून टोकियो असे करण्यात आले. जपानची विभागणी ४७ प्रांतांत करण्यात आली. स्वातंत्र्य आणि लोकहक्क चळवळीला प्रतिसाद म्हणून सरकारी संस्थांनी झपाट्याने विकास केला. इतो हिरोभूमी, जपानचे पहिले पंतप्रधान यांनी संविधान लिहिले, जे १८८९ मध्ये जाहीर करण्यात आले. मेईजी सरकारने व्यापक पाश्चात्यिकरणाला प्रोत्साहन दिले आणि जपानच्या संस्था पुन्हा तयार

करण्यासाठी शिक्षण, खाण, बँकिंग, कायदा, सैन्य आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रात तज्ज्ञ असलेले पाश्चात्य राष्ट्रांतील शेकडो सल्लागार नेमले.जपानी लोकांनी ग्रेगोरियन कॅलेंडर, पाश्चात्य कपडे आणि पाश्चात्य केशरचना स्विकारल्या. मेईजी कालावधी दरम्यान, जपानमध्ये औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे वेगाने संक्रमण झाले.

जपानच्या विदेशी विस्तारासाठी जपानी सैन्याने महत्त्वाची भूमिका बजावली. होक्काइडोवर नियंत्रण मिळवल्यानंतर जपानी सैन्याने चीन आणि कोरियावर आपले लक्ष केंद्रित केले. १८९४ मध्ये डोंघाक बंड दडपण्यासाठी चिनी आणि जपानी सैन्य त्या ठिकाणी तैनात झाले असताना कोरियामध्ये या दोन सैन्यांमध्ये चकमक झाली. डोंघाक शेतकरी क्रांती ही भ्रष्टाचारी सरकारच्या विरोधात सशस्त्र बंडखोरी होती.जपानच्या आगामी पहिल्या चीन-जपान युद्धाच्या वेळी जपानच्या अत्यंत कुशल सैन्याने क्विंग चीनच्या अनेक असंख्य व अधिक सुसज्ज सैन्य संघाचा पराभव केला. अशा प्रकारे १८९५ मध्ये तैवान बेटाला जपानच्या ताब्यात देण्यात आले. १९०२ मध्ये जपानने ब्रिटिशांशी महत्त्वपूर्ण लष्करी युती केली. त्यानंतर आशिया खंडात आपली शक्ती वाढविणाऱ्या रशियाशी जपानचा संघर्ष झाला. त्सुशिमाच्या लढाईने १९०४-०५ मधील रशिया-जपान युद्धाचा अंत झाला, जो जपानच्या सैन्यासाठी आणखी एक विजय होता. अशा प्रकारे जपानने १९०५ मध्ये कोरियाचा संरक्षक असा दावा केला आणि त्यानंतर १९१० मध्ये त्याचा पूर्ण ताबा घेतला.

### ताईशो कालखंड (१९१२-१९२६)

ताईशो हा जपानचा १२३ वा सम्राट होता. ३० जुलै १९१२ पासून ते २५ डिसेंबर १९१२ पर्यंत अगदी शेवटच्या श्वासापर्यंत त्याने जपानच्या साम्राज्याचा राजा म्हणून राज्य केले. सम्राट ताईशोच्या कारकीर्दीत जपानने मजबूत लोकशाही संस्था विकसित केल्या आणि जपानच्या आंतरराष्ट्रीय सामर्थ्यात वाढ झाली. सप्टेंबर



१९२३ मध्ये झालेल्या मोठ्या भूकंपामुळे १०,००,००० पेक्षा जास्त लोक मरण पावले आणि परिणामी लागलेल्या आगीमुळे तीन दशलक्षांहून अधिक लोकांची घरे उद्ध्वस्त झाली. १९२५ मध्ये सार्वत्रिक पुरुष मताधिकार सुरू झाला. सार्वत्रिक पुरुष मताधिकार हा मतदानाच्या अधिकाराचा एक प्रकार आहे ज्यात राजकीय प्रणालीतील सर्व प्रौढ पुरुषांना मिळकत, मालमत्ता, धर्म, वंश किंवा इतर कोणतीही पात्रता विचारात न घेता मतदान करण्याची परवानगी आहे. कधीकधी एक माणूस, एक मत या घोषणेने त्याचा सारांश दिला जातो.पहिल्या महायुद्धानंतर जपानने व्हर्साईच्या करारावर स्वाक्षरी केली आणि राष्ट्रसंघातील सदस्यत्व आणि आंतरराष्ट्रीय निःशस्त्रीकरण परिषदांमध्ये सहभाग केल्यामुळे जपानचे आंतरराष्ट्रीय संबंध सुधारले.

### शोवा कालखंड (१९२६-१९८९)

हिरोहितो शोवा हा जपानचा १२४ वा सम्राट होता. २५ डिसेंबर १९२६ ते ७ जानेवारी १९८९ (मृत्यू) पर्यंत त्याने जपानी साम्राज्याचा राजा म्हणून राज्य केले. हिरोहितो शोवा याचे ७३ वर्षांचे साम्राज्य जपानच्या इतिहासात प्रदीर्घ आहे. पहिली वीस वर्षे अत्यंत राष्ट्रवादाचा उदय आणि विस्तारवादी युद्धांच्या मालिकेद्वारे दर्शविली गेली. त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस, जगातील नवव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था, तिसऱ्या क्रमांकाची नौदल शक्ती आणि राष्ट्रसंघाच्या चार स्थायी सदस्यांपैकी एक असलेले जपान हे आधीपासूनच एक महान सामर्थ्य होते. जपानच्या साम्राज्य विस्तार, सैनिकीकरण आणि द्वितीय विश्वयुद्धात सामील होण्याच्या काळात जपानी साम्राज्याच्या घटनेअंतर्गत शोवा

हा राज्यप्रमुख होता. दुसऱ्या महायुद्धात पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर, जपानच्या इतिहासात प्रथमच परदेशी शक्तींनी कब्जा केला आणि नंतर पुन्हा एक प्रमुख जागतिक आर्थिक सामर्थ्य म्हणून जपान उदयास आले.

७ डिसेंबर १९४१ रोजी इम्पीरियल जपानी नेव्हीने हवाईच्या पर्ल हार्बर येथील अमेरिकन ताफ्यावर अचानक हल्ला केला. यामुळे अमेरिकेचे मित्रपक्षांच्या बाजूने दुसरे महायुद्ध झाले. त्यानंतर जपानने फिलिपिन्स, मलाया, हाँगकाँग, सिंगापूर, बर्मा आणि डच ईस्ट इंडीजसह अमेरिका, युनायटेड किंगडम आणि नेदरलँड्सच्या आशियाई वसाहतींवर यशस्वीरित्या आक्रमण केले. युद्धाच्या सुरुवातीच्या काळात जपानने विजयानंतर विजय मिळविला. एप्रिल ते जून १९४५ च्या दरम्यान झालेली ओकीनावाची लढाई ही युद्धातील सर्वात मोठी नौदल सैन्य हालचाल होती; ज्यात ७७,१६६ जपानी सैनिक आणि १,४०,००० हून अधिक नागरिक मरण पावले. तथापि, ६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकला आणि त्यात ७०,००० लोक ठार झाले. हा इतिहासातील पहिला अण्वस्त्र हल्ला होता. ९ ऑगस्ट रोजी सोव्हिएत युनियनने जपानविरुद्ध युद्ध घोषित केले आणि मंचुकुओ आणि इतर प्रांतावर आक्रमण केले. यावेळी नागासाकीला दुसऱ्या अणुबॉम्बची धडक दिली आणि सुमारे ४०,००० लोक ठार झाले. १९५६ मध्ये जपान युनाइटेड नेशन्सचे सदस्य बनले आणि १९६४ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन केले तेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली भूमिका बजावली. १९६० मध्ये लोकांनी यू. एस-जपान सुरक्षा कराराच्या बदलांविरुद्ध निषेध केला.

### हेइसेई कालखंड (१९८९-२०१९)

अकिहितो (७ जानेवारी १९८९ ते ३० एप्रिल २०१९) हा जपानच्या इम्पीरियल हाऊसचा सदस्य ज्याने जपानचा १२५ वा सम्राट म्हणून राज्य केले. वडील सम्राट हिरोहितोच्या मृत्यूनंतर सम्राट अकिहितोच्या कारकीर्दीची सुरुवात झाली. १९९० च्या दशकात जपानची आर्थिक कामगिरी अत्यंत खराब होती आणि १९८९ पूर्वीच्या काळात शेअर बाजार ज्या उंचीवर होता त्या उंचीवर तो पुन्हा कधीच गेला नाही. जपानमधील आजीवन रोजगाराची व्यवस्था मोठ्या प्रमाणात कोसळली आणि बेरोजगारीचे दर वाढले. ११ मार्च २०११ रोजी जपानमध्ये सर्वात मोठा भूकंप उद्भवला. परिणामी त्सुनामीने फुकुशिमामधील अणू सुविधांचे नुकसान केले.

### रेईवा कालखंड (२०१९ पासून सुरु)




रेईवा हा जपानचा चालू कालखंड आहे. याची सुरुवात १ मे २०१९ रोजी झाली, ज्या दिवशी सम्राट अकिहितोचा मोठा मुलगा नारुहीतो जपानचा १२६ वा सम्राट म्हणून गादीवर आला. जपानी सरकारने १ एप्रिल २०१९ रोजी थेट प्रक्षेपित होत असलेल्या एका पत्रकार परिषदेत 'योशिहिदे सुगा' यांनी पारंपरिकपणे एका फलकावर लिहिली कांजी उघड केली व नवीन कालखंडाचे नाव घोषित केले.

तर हा होता आधुनिक जपानचा इतिहास.जपानच्या विविध कालखंडातील घडामोडी, युद्ध, वेगवेगळे सम्राट यांची माहिती देण्याचा एक छोटासा प्रयत्न मी केला आहे. आता सुरू असलेल्या रेईवा कालखंडाचे आपण प्रत्यक्ष साक्षीदार होऊया. एडवर्ड हल्लेट कार यांचे एक अत्यंत सुरेख वाक्य आहे,त्याने मला या लेखाचा शेवट करावासा वाटतो - इतिहास हा वर्तमान आणि भूतकाळातील संवाद आहे.

**- गौरी अंबाजी परब**
तृतीय वर्ष- बी.एम.एम.(पत्रकारिता)
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

# गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांची प्रार्थना

*रवीन्द्रनाथ टागोर (१८६१-१९४१) हे भारतीय साहित्यातील ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व. ते शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, चित्रकार, संगीततज्ज्ञ, वक्ते, गद्य लेखक, समीक्षक, नाटककार, कथाकार, थोर कवी होते. साहित्यासाठी दिले जाणारे नोबेल पारितोषिक भारतातील एकमेव राष्ट्रीय कवी गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांना १९१३ मध्ये मिळाले. गीतांजली या त्यांच्या कवितासंग्रहाला हे पारितोषिक दिले गेले. या संग्रहातील Where the Mind is without Fear ही अजरामर कविता व त्याच्या भाषांतराचा रोचक आढावा प्रा. डॉ. दीपक बोरगावे यांनी प्रस्तुत लेखात घेतला आहे - संपादक*

१.

रवीन्द्रनाथ टागोर (१८६१-१९४१) हे भारतीय साहित्यातील ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व. टागोर हे काय नव्हते? ते शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, चित्रकार, संगीततज्ज्ञ, वक्ते, गद्य लेखक, समीक्षक, नाटककार, कथाकार, थोर कवी आणि अजून बरेच काही.

साहित्यासाठी दिले जाणारे नोबेल पारितोषिक भारतातील एकमेव राष्ट्रीय कवी गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांना १९१३ मध्ये मिळाले. गीतांजली या त्यांच्या कवितासंग्रहाला हे पारितोषिक दिले गेले. स्वत: इंग्रजीत अनुवादित केलेली टागोरांची गीतांजली ही १९१२ मध्ये प्रसिद्ध झाली होती (Issued in a limited editions by the Indian Society, 1912; First published by Macmillan, March,1913) आणि पुढच्याच वर्षी (१९१३) त्यांना या संग्रहासाठी नोबेल मिळाले. गीतांजली या संग्रहात एकूण १०३ कविता आहेत.

त्यांच्या कवितांच्या कक्षा ह्या व्यामिश्र आहेत. त्यांना कुठल्या पठडीत बसवणे हे काम मुश्कील आहे. त्यांच्या कवितांचे वर्गीकरण हेही अवघड काम आहे. त्या समजावून घेण्याच्या कुठल्या विशिष्ट पद्धती नाहीत. असे प्रयत्न काही समीक्षकांनी (उदा. निहाररंजन राय) केले आहेत, पण ते सारे व्यर्थ ठरले.

शिक्षणाचा त्यांचा शांतिनिकेतनचा प्रयोग हा अभूतपूर्व होता. विद्यार्थ्यांनी स्वत:चा शोध घ्यावा, भवतालाच्या निरिक्षणातून त्यांच्या अभिव्यक्तीला आकार प्राप्त व्हावा, हा मूळ आशय त्यांच्या शिक्षणप्रणालीचा होता. यातूनच ज्ञानाची किरणे त्यांच्या क्षितिजावर बांधली जातील, खुद्द जीवनाचे नृत्यच (Dance of Life) त्यांच्यासमोर अवतरेल असे त्यांचे म्हणणे होते. जशी झाडं आपले अन्न भवतालातून गोळा करुन आपली वाढ, आपला विकास साधतात, तसेच स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिले जावे. अध्ययनाची साधने, वह्या पुस्तके, गृहपाठ यापेक्षाही स्व-अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य टागोरांना अधिक महत्त्वाचे वाटते (आज तर, अभिव्यक्तीचा प्रश्न कळीचा झाला आहे; व्यवस्थेला प्रश्न विचारायचे नाहीत, जर विचारले किंवा व्यवस्थेबद्दल थोडीही नाराजी व्यक्त केली तरी तुम्हाला देशद्रोही ठरवले जाते, तुमच्यावर झुंडी सोडल्या जातात). शिक्षणातून मानवी नात्यांबद्दलची सहानुभूतीची भावना निर्माण होणे हे टागोरांना आवश्यक वाटते (A Poet's School). शिक्षणाचे खासगीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा सुळसुळाट, इंटरनॅशनल स्कूलचा विळखा या साऱ्या पार्श्वभूमीवर आज आपण शिक्षणाचा खेळखंडोबा करून ठेवला आहे!

काही महिन्यांपूर्वी, दक्षिणायन चळवळीच्या वतीने पुण्यात पेन इंटरनॅशनल कॉन्फरन्स झाली होती. एका सेशनमध्ये, या चळवळीचे प्रमुख, डॉ. गणेश देवी सरांनी एक भला मोठा बॅनर स्टेजवर सात-आठ कार्यकर्त्यांच्या साहाय्याने प्रदर्शित केला होता. या बॅनरवर टागोरांच्या कवितेतली पहिली ओळ होती: Where the Mind Is Without Fear. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न या चळवळीने लावून धरलेला आहे, याचे स्मरण हे या कवितेच्या निमित्ताने झाले.

कार्यप्रवणता ही लोकांच्या आंतरिक भावना काय आहेत यावर ठरते. हतबलता आणि अज्ञान झुगारून देण्यासाठी ही आंतरिक ओढ हवी. यातून नवा भारत निर्माण होईल. टागोरांचा हा आशावाद ब्रिटिश भारताच्या पार्श्वभूमीवर समजावून घ्यायला हवा. या त्यांच्या आकलनाला काळाच्या मर्यादाही होत्या.

वयाच्या एकविसाव्या वर्षांपासून कविता लिहिणारे टागोर आपल्या आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत (ऐंशी वर्षे) कविता लिहीत होते. ते चिरतरुण राहिले. टागोरांचे एक महत्त्वाचे समीक्षक, सिसीरकुमार घोष यांनी He was young when he died at eighty असे म्हटले आहे (Rabindranath Tagore, Sahitya Akademi, १९९०; २०१२, पृ. २८). इक्बाल या उर्दू कवीने त्यांना 'बुलबुल' या पक्ष्याची उपमा दिली आहे. पण या बुलबुलला गरुडाचे पंख होते!

टागोर समजावून घेणे ही गोष्ट अर्थातच खूप कठीण आणि आव्हानात्मक आहे. गीतांजलीमध्ये दुःख, खेद, करुण अशा भावना अधिक गडद आहेत; आनंद, सुख आणि आशा कमी गडद आहेत. १० आणि ७१ क्रमांकाच्या कविता सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांवर ताशेरे ओढणाऱ्या आहेत. रोमँटिक कवीप्रमाणे टागोरांची कविता ही अनेक भावभावना घेऊन अवतरते. ती अनेक मास्क धारण करते. आणि त्या मास्कमागे काय दडलेय, हे शोधणे कठीण होते आणि त्यांच्या गाभ्यापर्यंत पोहोचणे ही गोष्ट मग अशक्य होऊन बसते.

२.

Where the Mind is without Fear ही अजरामर कविता बहुतेक सर्वात जास्त वाचली गेलेली आणि अभ्यासलेली कविता असावी. ती मूलतः बंगाली भाषेत १९०० साली 'प्रार्थना' या शीर्षकाखाली लिहिली गेली होती. ती प्रथमतः नैवेद्य (जून-जुलै) ह्या बंगाली नियतकालिकात १९०१ साली प्रसिद्ध झाली. नंतर १९११ साली टागोरांनी ती इंग्रजीत अनुवादीत केली. ज्या गीतांजलीला नोबेल मिळाले त्या संग्रहात ही कविता ३५सावी कविता म्हणून छापलेली आहे (Gitanjali,Song Offerings Introd. W. B. Years Macmillan, 1946).

या प्रार्थनेतून टागोरांनी स्वतःची अशी स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. स्वातंत्र्यपूर्व भारतातील ब्रिटिश जुलमाचा याला राजकीय संदर्भ आहे. या कवितेत इश्वराकडे जुलूम, शोषण आणि अन्यायातून मानवाला मुक्ती मिळावी अशी प्रार्थना केली आहे. आत्मप्रतिष्ठा, दुसऱ्यांचा आदर आणि दुसऱ्यांना साहाय्य करणे ही मूल्ये जीवनात आत्मसात करायला हवीत. अंधश्रद्धेला झटकून देऊन डोळस श्रद्धा जागवायला हवी. सकारात्मकतेचा महामार्ग चालत विवेकाची कास धरायला हवी. आपले मन हे स्वच्छ पाण्याप्रमाणे नितळ आणि पारदर्शी ठेवायला हवे. त्याला इतर अविवेकी शक्तींचा स्पर्श होता कामा नये याची काळजी आपणांस घ्यायला हवी. भ्रष्टाचार, फसवाफसवी, शोषण, आणि गुलामी वृत्ती यातून सुटका करून घ्यायला हवी. यासाठी योग्य त्या प्रबोधनाचा, शिक्षणाचा आधार घ्यावा. अशा प्रयत्नांतूनच आपले बाहू हे परिपूर्णतेकडे झेपावतील आणि आपण यशस्वीतेचा रस्ता चालू शकू.

---

युद्धाची खरी भयानकता त्यात माणसे मरतात ही नसून; माणूस माणसाला मारायला तयार होतो ही आहे.

अशा नव्या प्रयत्नांतून कृतीप्रवण होऊन नवा माणूस आणि नवा भारत निर्माण होऊ शकतो याची त्यांना खात्री आहे, म्हणून ते इश्वराला तशी प्रार्थना करत आहेत:

Into ever-widening thought and action; / Into that heaven of freedom, / My Father, let my country awake.

ही कविता राष्ट्रभक्ती उद्युक्त करणारी असली तरी जातपात, अंधश्रद्धा, अविवेकी विचार आणि पूर्वग्रहदोषांवर आधारित विचार करत मार्गक्रमण करणाऱ्यांना त्यापासून दूर जाण्याचा संदेश देणारी कविता आहे.

या कवितेत 'the head is held high' and "knowledge is free' हे दोन शब्दसमूह (phrases) खूप महत्त्वाचे वाटतात. स्वाभिमान, ज्ञान, आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न या कवितेत केंद्रस्थानी आहे. एका विशिष्ट राजकीय परिस्थितीतले हे भाष्य आजही तेवढेच गंभीर आहे. ब्रिटिशांनी केलेल्या क्रूर पाशवी अत्याचाराविरुद्ध ही कविता आवाज देते. यातून प्रत्येक व्यक्ती ही आत्मसन्मान आणि अभिव्यक्तीचा आदर करणारी निर्माण होईल ही आशा कवितेतून व्यक्त झाली आहे. या कवितेचे हे सार्वत्रिक मूल्य आहे.

या कवितासंग्रहाला (खरे तर याला Yeats यांनी prose rendering असे म्हटले आहे) लाभलेली W. B. Yeats यांची प्रस्तावना मुळातून पाहाण्यासारखी आहे. तीन भागात सोळा पानांच्या या छोट्या निवेदनात एट्स गीतांजलीमुळे भारावून गेलेले दिसतात. गीतांजलीची पाने ही सतत त्यांच्या सोबत होती. जसा वेळ मिळेल तिथे, कोठेही ट्रेनमध्ये, ओम्नीबसमध्ये, रेस्टॉरंटमध्ये ते गीतांजली वाचत होते. १९१२-१३ नोबेल प्राईझ कमिटीचे एट्स चेअरमन होते (कदाचित, हाही एक दुवा टागोरांना नोबेल मिळण्याच्या संदर्भात महत्त्वाचा असावा, असे टागोरांच्या टीकाकारांनी म्हटले आहे).

टागोर यांना साहित्याचे नोबेल मिळाल्यामुळे त्यांना साहजिकच जागतिक कीर्ती लाभली. एट्स आणि टागोर यांची मैत्री खूप काळ टिकून राहिली. १९१३ मध्ये नोबेल मिळाल्यानंतर, १९३६ मध्ये एट्स यांनी Oxford Book of Modern Verse 1892-1935 (New York, 1936) संपादित केले होते आणि यात रवींद्रनाथ टागोर यांच्या सहा कविता समाविष्ट केलेल्या होत्या.

एट्सना गीतांजलीतून अभिसारीत झालेली ही पौर्वात्य परकी सांस्कृतिक परंपरा कोड्यात टाकणारी होती. टागोरांची तुलना त्यांनी संतांशी केली आहे. साधेपणा, निसर्गाशी एकरूपता, भव्य स्वप्ने, शिक्षणाचा आगळा प्रयोग ह्या साऱ्या बाबी त्यांना अभूतपूर्व वाटतात. टागोरांची कविता इंग्रजीत अनुवाद रूपाने आल्याने हे एक आपल्या हिंसक देशात नवा रेनसां आल्याचे त्यांना चिन्ह वाटते.

३.

गीतांजली मधल्या कविता टागोरांनी इंग्रजीत अनुवादित केल्या. या इंग्रजी अनुवादाचे अनुवाद मराठीत (आणि अन्य भाषांत) झाले. म्हणजे याला double translation म्हणावे लागेल. एका भाषांतरात/ अनुवादात (भाषांतर/अनुवाद या संज्ञा समअर्थी म्हणून वापरतो) काही loss होतोच; double translation मध्ये loss ही double होणार.

सुजीत मुखर्जी यांनी Translation as Recovery (Pencraft International, 2009) या पुस्तकात 'टागोरांनी बरेच मूळ बंगाली शब्द इंग्रजीत आणताना गाळले आहेत आणि आपला अनुवाद हा इंग्रजी वाचकांना friendly कसा होईल याची काळजी घेतली आहे', असे सप्रमाण सिद्ध केले आहे (पृ. ११३-२४). म्हणजे टागोरांनी आपली मूळ संहिता ही अपभ्रंशीत (distort) केली आहे. Translation as Recovery या पुस्तकात

Rabindranath in Translation नावाचा टागोरांवर एक स्वतंत्र विभागच आहे.

टागोरांचे साहित्य भारतीय आणि जगातल्या अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. टागोरांच्या कवितांचे अनुवाद हे बहुतेककरून इंग्रजी संहितेवरून झाले आहेत.

Where the Mind Is Without Fear या कवितेचे खाली दोन अनुवाद दिलेले आहेत (अजूनही काही असावेत; ज्येष्ठ साहित्यिक नरेंद्र जाधव यांनी देखील या कवितेला मराठीत चिरडले आहे, अशी माहिती माझ्या एका मित्राने मला आताच दिली).

सिंधू जोशी यांचा अनुवाद, तो काळ (१९६३) जरी लक्षात घेतला, तरी हा अनुवाद अधिक संस्कृताळलेला वाटतो; म्हणजे टागोरांचा इंग्रजी अनुवाद अधिक सुलभ, संप्रेक्षणात्मक आणि आशय गडद करणारा आहे, तर जोशींचा अनुवाद हा खूप गद्य, विधानात्मक, समजायला क्लिष्ट आणि निरस वाटतो.

एकच निरिक्षण नोंदवतो: टागोरांच्या या बंगाली कवितेतील पहिली ओळ, चित्तो जेथा भोयशून्यों अशी आहे. आता जोशी यांनी यांचा शब्दश: अनुवाद केला आहे: जेथें चित्त भयशून्य असते. स्वत: टागोरांनी चित्तो भोयशून्योंचे इंग्रजीत Where the Mind Is Without Fear असे केले आहे. बंगाली भाषेचे मला ज्ञान नाही, पण चित्तो भोयशून्यों ही भावावस्था निर्भयतेकडे जाणारी आहे. संपूर्ण निर्भयता ही अशक्य वाटणारी गोष्ट असली तरी एक आदर्श किंवा एक मानवी मूल्य म्हणून तिचा अन्वय आहे. यादृष्टीने भयशून्योंचा अनुवाद डॉ. चिंधडे यांनी भीतीमुक्त असा केला आहे, तो अधिक संयुक्तिक वाटतो.

डॉ. चिंधडे यांनी या कवितेला अनुवादातून गीत या रचनेत बांधण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे असे दिसते.

साहित्य अकादमीने, 'रवींद्रनाथांच्या १०१ कविता' (१९६३, २०१४) या शीर्षकाखाली त्यांच्या १०१ कविता मराठीत अनुवादित केल्या आहेत. Where the Mind Is Without Fear ही कविता सिंधू जोशी यांनी अनुवादित केली आहे (पृ. १३४)

**प्रार्थना**

जेथें चित्त भयशून्य असते,
जेथें मस्तक उंचावलेले असते,
जेथें ज्ञान मुक्त असते
जेथें घराच्या भिंती रात्रंदिवस आपल्या अंगणात
वसुधेला क्षुद्रखंड करून ठेवीत नाहीत,
जेथें वाणी हृदयाच्या निझरांतून उत्स्फूर्त होऊन बाहेर पडते,
जेथें देशोदेशीं दशदिशांत कर्मधारा अंकुंठीत प्रवाहानें
निरंतर सहस्रविध कृतार्थतेसाठी वाहात असते,
जेथें तुच्छ आचारांचें वाळवंट विचारांच्या ओघाचा मार्ग
ग्रासून टाकीत नाही–पौरुषाला शतदा खंडित करीत नाहीं,
जेथें तूं सर्व कर्म–विचार–आनंद यांचा अग्रणी आहेस,
अशा स्वर्गात, आपल्या हातानें निष्ठुर प्रहार करून,
हे जनका, भारताला जागृत कर.

डॉ. शिरीष चिंधडे यांचा अनुवाद :

चित्त जिथे भीतीमुक्त, उन्नत शिर, ऐशा
हे ईश्वर ! स्वर्गी त्या जागवी मम देशा ।।धृ ।।

मुक्त ज्ञान सर्वांस्तव, अडविती न भिंती
सत्य तेच शब्द जिथे ओठावर येती
खंड पाडती न मनी सीमांच्या रेषा !
हे ईश्वर !...

निरलस सायास जिथे पूर्णत्वा जाती
बुद्धी जिथे अव्हेरी मृत रिवाज रीती
क्षितिजासम मुक्त जिथे तुझी कृपा, ईशा !

हे ईश्वर ! ...
कृती, विचार समसमान स्फुरती भव्य जेथे
शतखंडित होती न कधी विक्रम वा जेते
निष्ठुर आघात करुनी उठवी भरतवर्षा
हे ईश्वर ! स्वर्गी त्या जागवी मम देशा !

स्रोत संहिता :

Where the Mind Is Without Fear
Where the mind is without fear and the head is held high;
Whnowledge is free;
Where the world has not been broken up into fragments
By narrow domestic walls;
Where words come out from the depth of truth;
Where tireless striving stretches its arms towards perfection;
Where the clear stream of reason has not lost its way;
Into the dreary desert sand of dead habit;
Where the mind is led forward by thee;
Into ever-widening thought and action;
Into that heaven of freedom,
My Father, let my country awake.

साहित्याचे नोबेल (Nobel Prize for Literature) मिळून भारताला या घडीला १०७ वर्षे झाली. गेल्या १०७ वर्षात आपल्याकडे या ताकदीचा लेखक, कवी, नाटककार, साहित्यिक झालाच नाही? भारतीय म्हणून ही गोष्ट चिंता करावी अशी आहे, असे आपणांस वाटते का? का नोबेल पारितोषिक यालाही काही अर्थ उरलेला नाही? टागोरांना नोबेल मिळाले; पण त्यांचीही नोबेल घेण्याची पात्रता नव्हती, असाही एक मतप्रवाह तत्कालीन काळात होता. प्रत्येक गोष्ट मोडीत काढण्याची आम्हाला सवय लागली आहे.

भारताला विविध विषयांचे अनेक नोबेल मिळाले, पण साहित्याचा नोबेल मात्र, आजही हाच एकमेव राहिलेला आहे. हे असे का व्हावे? याचा विचार मात्र आपणास गांभीर्याने करायला हवा.

**– डॉ. दीपक बोरगावे**
भक्तीनंदन, सर्वे नं : १/२/३१,
गल्ली नं : १, महादेव मंदिराशेजारी,
ममता नगर, जुनी सांगवी,
पुणे ४११०२७
मो: ९४२२५१८८६४/९४०५२६७७८२
Email : deepak.borgave7gmail.com

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

लागण्याची वाट पहावी लागते. माझ्या एका चीन भेटीत मी स्वतः शाळकरी मुले या केंद्रात मन लावून काम करताना पाहिली आहेत. त्यातील काही मुले तर शिबिर संपल्यावर देखील घरी जायला तयार नव्हती!

देशाची प्रगती साधायची असेल तर भविष्यात काय घडणार आहे याचा वेध घेऊन शालेय शिक्षणाची आखणी करणे आवश्यक असते. याची चांगली जाणीव चीनच्या विचारवंतांना आहे असे पदोपदी जाणवते. प्रतिकृती बनविणे, त्रिमितीय छपाई तंत्र अवगत करणे, यंत्र मानवाकडून काम करून घेणे अशी अनेक समाजोपयोगी कौशल्ये शालेय स्तरावरच विद्यार्थांमध्ये निर्माण कशी होतील याचा ते प्रयत्न करीतआहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे (Artificial Intelligence) वर्चस्व असणार आहे हे त्यांनी आधीच ताडले आहे. त्याबर हुकूम हा विषय शालेय स्तरावर कसा शिकविता येईल याची तयारी त्यांनी सुरू केली आहे. लवकरच चीनच्या शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे दिले जातील याबद्दल मुळीच शंका नाही.

**– डॉ. सुधाकर आगरकर**


आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावतील. आपले सुख दगडात कोरा, ते कोणीही खोडू शकणार नाही.

# समतोल गझलसंग्रह

*समतोल गझलसंग्रहाविषयी माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

शाम का वक्त हो शराब न हो
वक्त इतना कभी खराब न हो

महिना उलटून गेला असेल, एके संध्याकाळी देवा, मी आणि आनंद प्रमोददाच्या घरी पोहोचलो .. मनगटाला लागलेल्या अत्तरापासून ते मनाला भिडलेल्या गझलांच्या अत्तराने रात्रीचे २-३ कसे वाजले ते कुणालाच कळल नाही.. मेहंदी हसन, गुलाम अलीना ऐकणे, मस्त गप्पा, गझला असं बरंच काही 'फील' करून ती मंतरलेली रात्र घेऊन उणेपुरे ३ तासांची झोप घेऊन, सकाळीच फ्रेश होऊन, मी प्रमोददाच्या घरून 'समतोल' हा त्यांचा गझलसंग्रह 'सप्रेम भेट' घेऊन निघालो.. ही तीनही मंडळी घरामध्ये असताना मी बाहेर पडताना घराची कडी लावून घेतली व थोडा पुढे निघताच ह्या लोकांना मी आतमध्ये कोंडलंय हे लक्षात आले. मी पुन्हा कडी उघडून दारात डोकावून प्रमोददाला सांगितलं की, माझ्या रुमच्या सवयीनुसार मी कडी लावून निघालो होतो... ब्रश करत असणाऱ्या प्रमोददाला देखील मी कडी लावलेली जाणवले होते, पण तोंडात गुळणी असल्याने ते बोलू शकले नव्हते... मी दार उघडताच त्यांचा जीव भांड्यात पडला.. हा अनावश्यक विनोद लिहिण्याचं कारण हेच की, हा मोठ्ठा विनोद झाला आणि मी दार उघडले तेव्हा प्रमोददाचे लोभस, हसरे एक्स्प्रेशन्स मी कधीच विसरू शकणार नाही..




'समतोल' तीनदा वाचला... नंतर पुरून पुरून आवडणाऱ्या गझला पुन्हा पुन्हा वाचल्या... खूप दिवसाचं माझं हे सुरू होतं मनात की, एक रसिक म्हणून 'समतोल' वर काहीतरी लिहावं.. पण दरवेळी पेन हातात घेतले की काहीतरी काम निघायचं आणि लिहीलं जात नव्हतं.. ही अशी कामं घाईघाईत होतही नसतात.. त्याला वेळ यावी लागते.. मग असाच आत्ता रात्रीचे दोन वाजता 'समतोल' हातात घेऊन बसलोय... काय लिहिणार आहे माहीत नाही...

एक वाक्य प्रमोददा आणि 'समतोल' च्याबाबतीत मला सुरवातीलाच अधोरेखीत करावं वाटतं की प्रमोददा किंवा 'समतोल' कधीच कोसळत नाहीत ... ते झिरपतात.... आत ... खोलवर ...!!!

गझलेतलं मला फारसं कळत नसलं तरी ऐकताना जे चांगलं आहे ते माझ्या मन:पटलांवर कोरलं जातं हे मला ठाऊक असल्याने मी रसिक या नात्याने हे लिहितोय.. त्यात उणंपुरं काही असेल तर तो माझ्या अल्पबुद्धीचा दोष.. ही समीक्षा नक्कीच नाहीये...तेवढी अक्कल मला नाहीये... रसिक म्हणून लिहिलेला अभिप्राय म्हणा हवं तर...

मला वाटले होते तरी हाती न काही राहिले
ते घाव घालत राहिले, मी श्वास मोजत राहिलो!
हा संपल्यावर जन्म सारा प्रश्न आला मजपुढे
मी काय सांडत राहिलो, मी काय वेचत राहिलो!

'समतोल'च्या पहिल्याच गझलेतील या दोन शेरांनी गझलेच्या आणि गझलकाराच्या बाबतीतल्या माझ्या धारणा दृढ केल्या... प्रमोददाला आत्तापर्यंत मी कधीच बोललो नव्हतो.. मी कार्यक्रमांत ह्या माणसाला जसा हळवा, शांत, निर्विकार पाहिलाय अगदी तसाच तो मला गझलेतुनही भेटला.. उद्धृत केलेले दोन शेर युक्तिवाद करत नाहीत, बंड करत नाहीत.... 'कुणीतरी घाव घालताना' ... श्वास मोजण्याइतकी 'सहनशीलता' फार थोड्या लोकांत असते.. आणि ते कवीतील 'माणूसपणाचं' लक्षण असतं असं मला वाटतं...

'मज जरीही आपले केव्हा न मानले तिने
ती मला माझी परंतु वाटते अजूनही!
आठवायचे जरी नाकारले तिजला तरी
येरझारे कोण स्वप्नी घालते अजूनही!'

असं म्हणतात की 'उम्मीद पे दुनिया कायम है'. .. हे शेर 'अजूनही' ह्या शब्दातून 'उम्मीद' आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'समर्पण' स्पष्ट करतात...

गंधाळ तू जराशी त्या मोगऱ्याप्रमाणे
काट्यात आजवर जो बेजार जीव, सावर
छळले जरी जगाने झिडकारले तरीही
करुणा हवी मनातून, हृदयी अथांग सागर
झाले तुझे शुभंकर येणे घरात माझ्या
बघ चांदणे पसरले गगनामधील घरभर

अत्यंत अलवारपणे आपलं म्हणणं मांडताना काट्यात जीव बेजार झालेला असतानाही मोगऱ्याप्रमाणे गंधाळायला सांगणे हे 'जिंदादिलीचे' द्योतक आहे असं वाटून गेलं....

'करुणा हवी मनातून, हृदयी अथांग सागर'

ह्या एका ओळीसाठी मी प्रमोददाला सलाम करतो ... अतिशय सोप्प्या शब्दात माणूसपणाची व्याख्या त्यांनी लिहू घातली आहे...

तिसऱ्या शेरातला तिचे घरात येणे 'शुभंकर' होणं ही मनाला आल्हादपणा देणारी ओळ मला खूप आवडली... संध्याकाळी मंद वाऱ्यासवे घरभर मंजुळ संगीताने घर प्रसन्न होऊन जावं तसंच 'शुभंकर' हा शब्द माझ्या मनाच्या परडीत अलगदपणे विसावला अन् मी मनाशीच 'वाह ..!' म्हणालो...

'कोरडी राहू नको काठावरी
या प्रवाही एकदा उतरून जा'

'into it' होणं किती महत्त्वाचं असतं ते प्रवाहात पडणाऱ्यालाच ठाऊक... हे आवर्जून सांगावंस वाटतं की हा शेरसुद्धा एक लाघवी आर्जव आहे.. तो आदेश नाही...आक्रस्ताळेपणा तिथे नाही... आणि म्हणून त्याचं सौंदर्य आणखी खुलून येतं...

पूर्ण गझलसंग्रहात मला दोन शेर वाचताना 'नाद वलयं' कानी पडली, ते शेर म्हणजे :

जरी न हात जोडले, दिव्यात तेल घातले
तरी अखंड ज्योत ती सदैव तेवते कशी ?
सख्यास भेटतेस, बोलतेस, लाजतेस अन्
विचारतेस, 'मंजिरी मनात वाजते कशी?'

ह्या दोन्हीही शेरात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तरी काय असावीत..? मुळात अशा प्रश्नांना उत्तरे असतात का ..? कुठली दैवी शक्ती आपल्याला जिवंत ठेवत असते...? वैभवदा देशमुखचा मला आवडणारा एक शेर आत्ता आठवतोय..

'कोण मला बळ पुरवत आहे
मी खडकातून उगवत आहे'

---

दीपज्योतीमध्ये असे सामर्थ्य आहे की स्वत: प्रज्वलीत होऊन दुसऱ्याला प्रज्वलीत करते.

पुन्हा हाच प्रश्न पडतो की ' ज्योत कशी तेवतेय?', किंवा 'बळ कोण पुरवतेय?' .. संदर्भानुसार उत्तरे बदलतीलही ... दोन्हीही शेरांची व्याप्ती बघता 'अनामिक शक्ती' विषयी भाष्य करणारे हे दोन्ही शेर आहेत असे मला वाटते..

'तू इथे नसल्यावरी मी काय सांगू
एक साधी ओळही सुचणार नाही'

अर्थात हे कवीचं 'तिच्याविषयी' मनापासून असणारं प्रेम लपून रहात नाही... ती प्रेयसी असेल, ती प्रतिभा असेल पण ती गोष्ट मनापासून असल्यानेच 'एक ओळही सुचणार नाही' असं कवीला वाटून जातं... आणि ते आपल्या मनाला भिडतं...

'दाटते डोळ्यांत पाणी नेहमी
मज कधी जेव्हा हसावे वाटते'

ह्या साध्या सरळ शेराने मला काही क्षण स्तब्ध केल होतं... अश्रुंचा कडेलोट होणं ही दु:खाची परिसीमा गाठल्याचं लक्षण आहे आणि तरीसुद्धा त्याबद्दल तक्रार न करता ' जे आहे तसे ' स्वीकारणे कवी पसंत करतो आणि मग हा वर उद्धृत केलेला शेर येतो ...

'कितीदा पुन्हा पुन्हा इथेच ठेच लागली
तिथेच ठेच लागुनी पडायचेच आणखी'

यासारखा ठेच लागूनही तोच तोच वेडेपणा करणारा 'मस्तमौला' त्यात दिसतो...ह्या वेडेपणातच कलाकाराचं शहाणपण असतं ...

काहीशा नाराजीच्या सुरात का होईना पण कलेच्या क्षेत्रातलं कटू सत्य अधोरेखित करणारा एक शेर समोर येऊन जातो :

जोवर जिवंत तोवर किंमत कुणा मिळाली
'होता प्रमोद' नंतर जगही म्हणेल सारे

गझलसंग्रह वाचत जाऊ तसतसे छान शेर वाचायला मिळतात...

तुझा मी हात हाती घेऊनी जेथे उभा राही
तिथे तो आठवे सारा मला इतिहास दाराशी
कशाने स्तब्ध झाली ही अचानक कोवळी किरणे
उभी ती घेउनी होती कुणाचा ध्यास दाराशी?

हे दोन्हीही शेर वाचताना मी संध्याकाळी अंगावर काटे अनुभवलेत ... इतिहास दाराशी येउन तो आपल्याला आठवणं आणि 'कोवळ्या किरणांचं स्तब्ध होणं' हे मी फक्त आणि फक्त 'फील' करू शकतो ...

असाच एक शेर (मतला) जो वाचता क्षणी मी तिथे वाह... ग्रेट..!! असं लिहून मोकळं झालो तो म्हणजे :

'पतंग झेप घ्यायचा, दिवा विझून जायचा
मरूनही कधी कुणी असे जगून जायचा'

प्रमोददा ह्या शेराबद्दल मी काहीही बोलणार नाही .. मी फक्त आणि फक्त आलिंगन देऊ शकतो... आणखी एक मस्त शेर ज्याने मला वाह ..! लिहायला भाग पाडलं तो म्हणजे :

'जीर्ण झोपडी, गळके छप्पर
तास तास का झडतो पाऊस'

हा शेर मी चित्ररूपाने visualize करू शकलो...

वेडेपणा बघायचा असेल तर हा शेर वाचायलाच हवा :

तू पहा ना स्वागताची मी कशी केली तयारी
ही अशी केली कुणी गगनास या आरास साऱ्या

'गगनाला आरास करण्याची' कल्पना प्रमोददा तुम्हीच लिहावी... तुमची एक मला खूप आवडणारी

(पृष्ठ क्र. २८ वर)

# आर्थिक मंदी : एक राजकारण

*आर्थिक मंदीवर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांचा लेख- संपादक*

गेले काही आठवडे आपल्या देशात आर्थिक मंदी या विषयाची एकदम जोरदार चर्चा सुरू आहे. ते अतिशय साहजिकच आहे. वार्षिक आर्थिक विकासाचा दर गेले सव्वा वर्ष कमी - कमी होत जातो आहे. गेल्या सलगपणे ५ तिमाही अहवालात त्याची आकडेवारी जाहीर होत आहे.

प्रामुख्याने वाहन उद्योग (आटोमोबाईल) आणि गृहनिर्माण ही क्षेत्रे त्यात आघाडीवर आहेत. ही दोन्ही क्षेत्रे तुमच्या - माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांसाठी अनेक अर्थांनी जवळचीही आहेत आणि जिव्हाळ्याचीही आहेत. त्यातच या दोन्ही क्षेत्रांतील उद्योजकही संघटीत आहेत आणि कामगारही संघटीत आहेत. त्यामुळे या दोन क्षेत्रांबाबत सामाजिक संवेदनशीलताही तीव्र आहे आणि राजकीय संवेदनशीलताही ! अर्थातच मुळातच राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न (जीडीपी) आणि रोजगार या दोन निकषांवरही या दोन क्षेत्रांचे स्थान अग्रगण्यच आहे. त्यामुळे आर्थिक मंदी हा विषय जास्तच चर्चेत राहातो आहे. हे त्या विषयाचे अर्थकारण तर आहेच; पण तितकेच ते राजकारणही आहे.

पण आर्थिक मंदी या मूलतः आर्थिक असणाऱ्या विषयाला राजकीय वळण देण्यात केवळ उद्योजक किंवा ग्राहक कारणीभूत नाहीत; सरकार आणि विरोधी पक्षही त्याला तितकेच कारणीभूत आहेत.

आणि त्यामुळे आर्थिक मंदीच्या चर्चेतील राजकारणच आधी पाहिले तर ! ! ! !

मुळातच आर्थिक मंदी (असलेल्या आणि नसलेल्याही) चा जाणवण्याजोगा पहिला परिणाम हा नेहमीच वाढती महागाई हा असतो. आणि महागाई ही आर्थिक किती आणि राजकीय किती ही चर्चा महागाईच्या प्रत्येक कणात आणि प्रत्येक क्षणात होत असते. चर्चा हा शब्द मवाळ रूप आहे .... खरं तर तो वाद असतो. इथेच मंदीचे राजकारण सुरू होते आणि सुरू राहाते. हे आजही होत आहे . केवळ आजच होत आहे असं मात्र नाही. २००८ सालची मंदी जागतिक कारणांमुळे होती हे (आता) सर्वमान्य असले तरी तेंव्हाही हे होते. अगदी तेंव्हा ते मान्य नसणे आणि आता मान्य असणे हेही राजकारणच नाही का? अगदी १९२९ च्या जागतिक मंदीला १९२५-१९२६-१९२७ या ३ वर्षांत जर्मनीने केलेल्या विश्वविक्रमी औद्योगिक उत्पादनाला कारणीभूत धरणारे आजमितीलाही काही कमीजण नाहीत . त्यातले काहीतर १९१४ ते १९१८ या काळात झालेले पहिले महायुद्ध आणि त्या पार्श्वभूमीवर जर्मन राजकारणात डॉल्फ हिटलरचा झालेला उदय इतके मागे जातात.

आर्थिक मंदी हा विषय राजकारण करायला सोयीचाही असतो का? कारण हा विषय जितका तात्कालिक असतो; तितकाच तो तात्कालिक नसतोही. एकंदरीतच अर्थव्यवस्था, आणि विशेषतः आर्थिक मंदी आणि शेअरबाजारातील तेजी, हे घटक तसे असतात.

मला तर नेहमीच असं वाटते की अर्थव्यवस्था ही प्रेयसी सारखी असते ....ती कारण आहे की परिणाम

हे कधीच आणि कधीही कळत नाही.

अशी संदिग्धता राजकीय वळण द्यायला सोयीची जाते ... कारण त्यातून चर्चेची किंवा वादाची संधी मिळाली तरी धोरणात्मक जबाबदारी किंवा उत्तरदायित्व नक्कीच टाळता येते.

आता हेच बघा ना .... आपल्या देशात आर्थिक मंदीच्या चर्चेने जेव्हा जोर धरला तेव्हा तथाकथित सरकार समर्थक (हल्लीच्या परिभाषेत मोदीभक्त) सूर आळवू लागले की मुळातच मंदी नाही; आणि जर काही असेल तर ती विरोधकांनी निर्माण केली आहे ....निदान शाब्दिक तरी!

या विधानाला वक्रोक्ती म्हणायचे की विनोद ?

गेली ६ वर्ष इतके चांगले बहुमत असणारे सरकार असूनही जर विरोधक अशी मंदी आणू शकत असतील तर एक नागरिक आणि एक मतदार म्हणून असा प्रश्न पडतो की मग असे सरकार निवडून देऊन उपयोग काय?

दुसरे म्हणजे, हा जर सिद्धांत मान्य करायचा झाला तर २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात, आणि त्यातही विशेषतः २००९ ते २०१४ या ५ वर्षांत काहीच झाले नाही अशी जी आरडाओरड केली जाते, ते जर खरे असेल तर त्याला जबाबदार त्यावेळचे सरकार की त्यावेळचा विरोधी पक्ष ?

आर्थिक मंदी : एक राजकारण, असं म्हणायचे दुसरे कारण म्हणजे, ती संकेत देत असते. पण त्याकडे कितीवेळा लक्ष दिले जाते ? सत्तारूढ पक्ष ती धोंड दुर्लक्षित करण्याची सोय बघतात; तर विरोधी पक्ष संकेतांपेक्षा ती भडकण्याची वाट पाहात असतात. तुमच्या – माझ्यासारखे सर्वसामान्य सदासर्वकाळ त्यापुढे अगतिक तरी असतात; नाहीतर हतबल तरी !

हे संकेतही मोठे सूचक असतात ....बऱ्याचवेळा नंतर लक्षात येणारे ...

हे कसे असतं ते सांगू ! ! !

गणपतीच्या दिवसांत आपला विशितला मुलगा कोणीही न सांगता, आपणहून प्रसाद द्यायला पुढे सरसावला की ओळखायचे असते .... की आपल्या होणाऱ्या सूनबाई दर्शनाला आल्या आहेत ... दर्शन द्यायला की घ्यायला ही बाब अलाहिदा ! ! ! ! .... हे तेव्हा आई – वडील म्हणून कुठे आपल्याला कळलेले असते ?

मंदीचे तसेच असते.

देशात अचानक उच्चरवाने राजकीय आणि सामाजिक घटकांची आणि घटनांची चर्चा सुरू झाली की ओळखायचे असते की आर्थिक आघाडी आलबेल नाही ! ! !

आर्थिक मंदी : एक राजकारण, असं म्हणायचे तिसरे कारण म्हणजे तोंडाने त्या मंदीचा उच्चारही न करता त्याबाबत केले जाणारे उपाय. उपाययोजना जर सुरू करत आहात तर देशातल्या जनतेला विश्वासात घेऊन तसं सांगा ना ! अनेकदा अशी मंदी केवळ देशांतर्गत घटकांवर अवलंबून नसून काही जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या घटकांचाही परिणाम असते हे सर्वसामान्यांनाही समजू शकते. पण हे कधीच, कोणत्याही मन की बात मधे होत नाही. तसं करण्यात नेमके काय आड येते ? हेच मुळातच राजकारण असते.

याच मुद्याची दुसरी बाजू अशीही आहे की, अर्थव्यवस्थेत आज पाऊल उचलले आणि उद्या त्याचा परिणाम दिसू लागला असे होत नाही. हे त्याचे स्वरूप मंदी या मुद्यावर राजकारण करायला अतिशय सुपीक भूमी पुरवत राहाते.

आर्थिक मंदी : एक राजकारण, असं म्हणण्याचे चौथे कारण म्हणजे त्याबाबत जाहीर होणाऱ्या सवलती किंवा उपाययोजना. त्या तातडीने जाहीर केल्या जातात. निदान तसे दाखवले जाते. पण खरंच त्या किती प्रमाणात प्रभावी असतात किंवा ठरतात?

गेल्या अनेक वर्षातल्या अनेक उदाहरणांचा विचार करताना हे फार प्रकर्षाने जाणवते. त्यांचे हे स्वरूप अर्थकारणाची कमी आणि राजकारणाची जास्त पार्श्वभूमी ठरते.

मला तर फार वाटते की, आर्थिक मंदीबाबतचे असे उपाय म्हणजे एअर – इंडियाच्या विमानात देतात तसा ब्रेकफास्ट (नाश्ता) आहे ...

तिथे कसा गोडाचा शिरा जरासुद्धा गोड नसतो आणि कांदेपोहे बिलकूल खमंग नसतात ....

खर्च तर होतोय; पण कोणाचेही समाधान मात्र नाही ....

निव्वळ संबंधित कायदा किंवा नियम किंवा संकेत किंवा मार्गदर्शक तत्त्वे यांचे पालन ....शब्दशः; निव्वळ शब्दशः ....

वर त्याचे आहारशास्त्र सांगत समर्थन! .......

आर्थिक मंदीबाबतच्या उपाययोजना दुसरं काय असतात?

आर्थिक मंदी : एक राजकारण असे म्हणायचे पाचवे कारण म्हणजे त्याबाबत करायला जावे एक आणि व्हावे भलतेच असा अनेकदा येणारा अनुभव आणि त्यातून अनवधानाने होणारे विनोद. त्याला होणारे विनोद म्हणायचे की उघडे पडत जाणारे अज्ञान? अज्ञान की अहंकार? अहंकार की अगतिकता? सोय की सोयीस्कर दुर्लक्ष? गृहीत धरतात की धरले जातात? मंदी आर्थिक असली तरी अशा बाबतीत सुगी ठरते का?

आता हेच बघा ना ... वाहन उद्योगातील मंदीचा ऊहापोह करताना माननीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, ओला – उबरच्या वाहनांना मिळणाऱ्या वाढत्या प्रतिसादांमुळे मोटारीची विक्री कमी झाली. आणि त्यानंतर हल्लीच्या रिवाजानुसार त्याची अनेकांनी अनेकदा पुनरुक्ती केली. हे विधान धाडसाचे म्हणायचे की अनावश्यक साहसाचे?

कारण ओला – उबरचा प्रतिसाद गेल्या ५ वर्षात वाढला. या क्षेत्रांतील देशी आणि विदेशी गुंतवणुकीस चालनाही गेल्या ५–६ वर्षांतच प्रामुख्याने दिली गेली. मग या ५–६ वर्षांच्या काळात कोणाचे सरकार होते? ही धोरणे अंमलात आणताना याबाबत पुरेसा विचार केला नव्हता का? त्या धोरणांचा असा काही परिणाम होईल याचा थोडाही अदमास बांधला गेला नव्हता का? ही धोरणे राबवायला सुरवात केल्यावर त्यांचे काय परिणाम होत आहेत, ते अपेक्षित आहेत की अनपेक्षित यांवर सरकारचे लक्ष नव्हते का? लक्ष असेल तर आज मंदी आल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा आधीच का केली नाही? आणि लक्ष नसेल तर ते अक्षम्य नाही का?

हे अर्थकारण की राजकारण?

या मंदीचा पहिला बळी केंद्रीय अर्थमंत्रीपद ठरल्यास ते अर्थकारण की राजकारण?

आर्थिक मंदी : एक राजकारण असं म्हणायचे सहावे कारण हे जितके राजकारण आहे, तितकेच औद्योगिक किंवा आर्थिक आहे. आपल्या देशातली वाहन – उद्योगातली अग्रगण्य कंपनी म्हणजे मारुती – सुझुकी. त्यांनी सुमारे अडीच वर्षांपूर्वीच जाहीर केले की, ते पेट्रोल गाड्यांचे उत्पादन बंद करतील. डिझेल

गाड्यांचे उत्पादनही ते हळूहळू कमी करत आहेत. गेले कित्येक महिने त्यांची मासिक विक्रीची आकडेवारी उतरती भाजणी दाखवत आहे. गेले अनेक महिने ही कंपनी दर महिन्याला किमान दोन दिवस त्यांचे आपल्या देशातील दोन राज्यांतले दोन कारखाने उत्पादनासाठी बंद ठेवत आहे. म्हणजे मंदी इतकी जुनी आहे? आणि ती तशी असल्यास संबंधित कंपनी या काळात कोणती धोरणे राबवत होती? आणि सरकारही काय करत होते?

पण इतकावेळ ही कंपनी पारंपरिक अशा पेट्रोल – डिझेल स्वरूपाच्या गाड्यांकडून ई – वेईकलच्या उत्पादनाकडे वळत आहे असे सांगितले जात होते. पण त्याच ई – वेईकलची सक्ती जाहीर झाल्यावर वाहन – उद्योगात मंदीची आरडाओरड कशी काय होते? आणि सरकारही ताबडतोब स्वतःच्याच निर्णयाला मागे कसे काय घेते?

असं तर नाही, की आपला आधीचा निर्णय चुकला हे सरकारच्या लक्षात आल्यावर 'तुम्ही रडल्यासारखे करा; आम्ही सावरल्या सारखे करतो' असे तर नाही?

आणि जर तसे नसेल तर मंदीची बोंब ठोकली जाईपर्यंत वाट का पाहिली गेली?

कदाचित हे सरकार बदलत्या परिस्थितीला सामोरे जाते असा पवित्रा सिद्ध करण्याचा हा राजकीय डाव असावा का? (निश्चलनिकरणाच्या वेळी असंच होतं का?)

कोणाचे अर्थकारण आणि कोणाचे राजकारण?

आर्थिक मंदी : एक राजकारण असे म्हणण्याचे सातवे कारण म्हणजे वाहन उद्योगाला एकीकडे सरकार सवलती देत आहे आणि त्याचवेळी त्याच उद्योगातल्या मारुती – सुझुकीचे सर्वेसर्वा भार्गव साहेब मात्र ठामपणे सांगतात की, मारुती – सुझुकी कोणत्याही परिस्थितीत distress sale करणार नाही.

अशी आर्थिक व मानसिक शक्ती असलेल्या क्षेत्राला कसं काय मंदीग्रस्त म्हणायचे ?

इंडिया सिमेंटचे श्रीनिवासन तर वाहन उद्योगाला ''रडके पोर'' (क्रायिंग बेबीज) म्हणत आहेत.

मंदी .... अर्थकारण की राजकारण?

आजकाल मला सद्याची आर्थिक मंदी हे समंजस गृहीतक की असमंजस ताळेबंद हाच प्रश्न पडतो!

**– चन्द्रशेखर टिळक**
सी –४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

---

(पृष्ठ क्र. २४ वरून - **समतोल गझलसंग्रह**)

गझल इथे देतो आणि थांबतो... समतोल हा गझलसंग्रह खूप आवडला... खूप खूप शुभेच्छा ...

अद्याप सारे आठवे ते बोलणे माझे तुझे
होकार दिसतो का कुठे हे शोधणे माझे तुझे
ते भेटणे अन् दूर होणे संपले नाही कधी
ते नाईलाजाने दिशाहीन चालणे माझे तुझे
ती रात्र होती भोवती अन गात्र तरिही संयमी
ते चांदण्यांच्या सोबतीने जागणे माझे तुझे
नाही कधीही टाकली आपण चुकीची पावले
टाळून साधा स्पर्शही ते बहरणे माझे तुझे
साऱ्या उभ्या जन्मातल्या त्या मोजक्या काही खुणा
आता स्मृतींच्या कोंदणातून वेचणे माझे तुझे

प्रमोददा ह्या एका निरागस शेरासाठी जियो यार :

नाही कधीही टाकली आपण चुकीची पावले
टाळून साधा स्पर्शही ते बहरणे माझे तुझे

**– श्रीपाद जोशी**

---

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### १ ऑगस्ट – लोकमान्य टिळक पुण्यतिथी

विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेच्या सर्व शाखाप्रमुखांनी वर्षभराच्या कामाच्या अहवालाचे वाचन केले गेले. त्यात पुढील विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्याबद्दल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

- प्रज्ञा मोरे, सेजल रांगळे (१०वी) – चायना
- मकाऊ आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकल्प सादर करून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक.
- नाविन्य मेटकरी – राष्ट्रीय बालवैज्ञानिक परिषदेत राष्ट्रीय स्तरावर प्रकल्प सादर करून सुवर्णपदक प्राप्त केले.
- रुद्र जेवळीकर (१० वी) – शालांत परीक्षेत सर्वप्रथम
- हर्षाली भुरे (९ अ) – माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त
- दीपाली ढोके (६ अ) – पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त
- विपुल परब (८ ड) – कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक (जिल्हास्तर, विभागीय, राज्यस्तरीय)

### विविध स्पर्धा

• रोटरी क्लबकडून इ.९वीसाठी वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक वर्गातून ५ विद्यार्थी. एकूण १५ विद्यार्थ्यांमधून प्रथम आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे –

१) श्वेता चिले (९अ)

२) साक्षी लांजेकर (९ब)

• लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त शाळेत वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या.

• ब्राह्मण सेवा संघातर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत,– संस्कृती किरण पवार – इ. ६ अ – उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. मार्गदर्शन केले होते सौ. साधना जोशी यांनी.

• इ. ७ वी ड व इ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ज्ञानप्रबोधिनीचे वर्ग घेण्यात आले.

### निसर्ग मंडळ

**• गणेश मूर्ती कार्यशाळा**

दि. १० ऑगस्ट रोजी झालेल्या निसर्गमंडळ सभासद विद्यार्थ्यांना पर्यावरण पुरक गणेशोत्सवाची माहिती देण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून शाडूच्या मातीची गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. पर्यावरण दक्षता मंचच्या सौ. सुवर्णा बंगे यांनी कार्यशाळा घेतली. निसर्ग मंडळाच्या ५० सभासदांसह शाळेतील सौ. झंझाड, सौ. दडपे, सौ. बोरवणकर या शिक्षकांनी सहभाग घेतला. प्रसंगी लायन्स क्लबचे सभासदही उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सौ. अडसुळे यांनी केले होते.

**• इको–फ्रेन्डली बर्थ–डे**

निसर्ग मंडळाच्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना इकोफ्रेण्डली बर्थ डे ही संकल्पना समजावून सांगण्यात आली. यात आपण ज्या पद्धतीने वाढदिवस साजरे करतो त्यात प्रदूषण निर्माण कसे करतो हे विद्यार्थ्यांना सांगून त्यावर उपाय म्हणून वापरण्यात येणाऱ्या सर्व वस्तू ज्या विघटीत होणाऱ्याच वापराव्यात हे कृतीतून

सांगण्यात आले. कागदी फुलपाखरे, कागदी फुगे विद्यार्थ्यांना शिकविले. तसेच सप्टेंबर महिन्यात वाढदिवस असलेल्या विद्यार्थ्यांचा वाढदिवस पौष्टिक केक कापून प्रातिनिधीक स्वरूपात साजरा केला.

- **स्काऊट-गाईड उपक्रम**

देश संरक्षणासाठी सैनिक सीमेवर कसे लढतात याचे प्रत्यक्ष अनुभव ऐकण्यासाठी इ. ९ वीचे विद्यार्थी गडकरी रंगायतन येथे सहभागी झाले.

मंत्री महोदयांच्या स्वागतासाठी इ. ७वी क चे बॅण्डपथक सुसज्ज होते.

- **सेवा प्रकल्प**

सेवा प्रकल्पांतर्गत इ. ८ वीच्या स्काऊट व गाईडने ठाण्यातील प्रसिद्ध शंकराचे मंदिर श्री कौपिनेश्वर मंदिरात भक्तांच्या रांगा लावणे, वृद्धांना दर्शनासाठी मदत करणे, लहान बालके ज्यांच्याकडे आहेत अशा मातांना दर्शनासाठी नेणे, गरोदर मातांना मदत करणे व अन्य सेवा देणे अशा पद्धतीने सेवाप्रकल्प राबविला.

- **रक्षाबंधन**

- गाईड विद्यार्थिनींनी ठाण्यातील तीन हात नाका येथील ट्रॅफिक पोलिसांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले.

- १९ ऑगस्ट रोजी गडकरी रंगायतन येथे 'पहचान शौर्य से' या कार्यक्रमात गाईडच्या बॅण्ड व बासरी पथकाने सुंदर धून वाजवून पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमामध्ये परमवीर चक्र विजेते सुभेदार संजय कुमार व कर्नल डॉ. राजेश अडाऊ (सेना मेडल) यांनी कारगिल युद्धभूमीवरील विजयीगाथा व थरारक अनुभव घेण्यासाठी स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांना आमंत्रित केले होते. सोबत आर्मी प्रवेशासाठी आर्मी रिक्रुटमेंट बोर्ड कुलाबा, मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले व माहितीपत्रके देण्यात आली. या कार्यक्रमात गाईड विद्यार्थिनींनी राखी बांधून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास २०० स्काऊट-गाईड यांच्याबरोबर मुख्याध्यापक श्री. प्रकाश पांचाळ, सौ. बोरवणकर, सौ. तातळे, सौ. रोंगटे, श्री. शिरापुरी इ. शिक्षक उपस्थित होते.

- शाळेत स्काऊट-गाईड दिक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी स्काऊट-गाईड शपथ देण्यात आली व खाऊचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी ठाणे जिल्हा आयुक्त गाईड श्रीमती जॉड्डीन अल्मेडा यांनी मार्गदर्शन केले.

**हस्तकला उपक्रम**

- **गणपती मूर्ती कार्यशाळा**

दरवर्षी यंदाही शाडू मातीपासून गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. हे कार्यशाळेचे १५ वे वर्ष होते. दरवर्षी ५०-६० विद्यार्थी या कार्यशाळेस सहभागी होतात.

- **निर्माल्यासाठी कागदी पिशव्या तयार करणे.**

दरवर्षी हस्तकला उपक्रमांतर्गत एक ते दीड हजार वर्तमानपत्रांच्या पिशव्या तयार केल्या जातात व त्या गणपती कारखान्यात गणपती नेण्यासाठी आलेल्या व्यक्तीच्या हातात निर्माल्य टाकण्यासाठी विनामूल्य देण्यात येतात. हे कार्यही १० ते १५ वर्षांपासून सातत्याने चालू आहे. विद्यार्थी आपल्या परिसरात, शेजारी, सार्वजनिक ठिकाणी जाऊन या पिशव्यांचे वाटप करतात. या हस्तकला उपक्रमांचे आयोजन सौ. बोरवणकर यांनी केले.

- **पथनाट्य स्पर्धा**

जिज्ञासा ट्रस्ट आयोजित गणेशोत्सवानिमित्त आंतरशालेय पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांनी 'मराठी भाषा-

असून अडचण, नसून खोळंबा' या विषयावरील पथनाट्य सादर केले. त्यास रु. १०००/–, प्रशस्तिपत्रक, स्मृतिचिन्ह असे पारितोषिक प्राप्त झाले. तसेच लेखकाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ईशान चांदणे यास प्राप्त झाले. सदर पथनाट्यास पालक श्री. रमेश चांदणे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

• मराठी विज्ञान परिषद आणि सांस्कृतिक कार्यसंचालनालय, महाराष्ट्र शासन आयोजित 'राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका प्राथमिक स्पर्धेत, आपल्या शाळेतील इ.८वीच्या विद्यार्थ्यांनी 'विश्ववेधी स्टिफन' ही एकांकिका नवी मुंबई, वाशी येथे सादर केली.

**• खेळ**

सन २०१९ च्या शैक्षणिक वर्षात दोन नवीन कॅरम स्टॅण्ड आणून कॅरम स्पर्धेसाठी मुलांना सहभागी होण्यास प्रवृत्त करण्यात आले. तसेच बुद्धिबळ खेळाचे आयोजन करण्यात आले. यावर्षी दोन्ही खेळांचा समावेश शालेय क्रीडास्पर्धेत होणार आहे.

**शिक्षक दिन**

• दरवर्षीप्रमाणे यंदाही इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी इ. ५वीते ९ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय विषय शिकवून अध्यापनाचा आनंद घेतला व शिक्षक दिन साजरा केला.

• यंदाचा भारत विकास परिषदेतर्फे देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. ज्योती केदारे यांना प्राप्त झाला. प्रसंगी विद्यार्थिनी सृष्टी कमटलवार व साक्षी लांजेकर यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**ऑगस्ट व सप्टेंबर मधील उपक्रम**

२९ ऑगस्ट २०१९ – या दिवशी शाळेत गणेश उत्सव साजरा झाला. नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांनी शिक्षकांसोबत शाडू मातीची गणेश मूर्ती आणली. टाळ वाजवून गणपती बाप्पा मोरया म्हणत गणरायाचे स्वागत झाले. शिक्षकांबरोबर मुलांनीही गणपतीची पूजा केली, आरती म्हटली. गणपतीचे श्लोक व गाणीसुद्धा गायली. गणपतीच्या गोष्टींची चित्रफीत (C.D.) मुलांना दाखवण्यात आली. सिनीयरच्या मुलांनी गणपती स्तोत्र म्हटले. प्राथमिक विभागाच्या काही विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष पठण केले. मुलांना तळलेल्या मोदकाचा प्रसाद दिला गेला. गणपतीची मूर्ती शाडूची का असावी, सजावट सहज उपलब्ध असलेल्या साडी, पानं फुलं यानींच करावी. जेणेकरून हा उत्सव पर्यावरणपूरक साजरा करता येईल याची माहिती शिक्षकांनी दिली.

या दरम्यान नर्सरीच्या व ज्यूनियरच्या मुलांना वर्तमानपत्रातील गणपतीचे चित्र कापून ते चिकटवणे व मोदक, जास्वंदीची फूले रंगवणे यासाठी वर्कशीट अपलोड केली गेली व सिनीयरच्या मुलांनी वर्तमानपत्रातील चित्र त्यांच्या चित्रकला वहीत चिकटवून आजूबाजूला सजावट केली.

सिनीयरच्या मुलांनी लेझीमच्या ठेक्यावर गणपती बाप्पांची विसर्जन मिरवणूक काढली. तलाव, नदी, समुद्र यामधे विसर्जन न करता एखाद्या मोठ्या बादलीत विसर्जन करावे यामुळे जलप्रदुषण होणार नाही अशी शिकवण प्रत्यक्ष कृतीतून शिक्षकांनी दिली.

गेली जवळपास १७ वर्षे शाळेत पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यावर भर दिला जात आहे.

२७ सप्टेंबर–नर्सरी विभागात 'फळ दिवस' म्हणून साजरा के ला गेला. मुलांनी फळांचे कटआऊट्स घातले होते व त्या फळांबददल २ –३ वाक्यात माहिती दिली. डब्यात सुद्धा मुलांनी फळे आणली होती.

या उपक्रमाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला व दिवसाचा आनंद अनुभवला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

कै. मुग्धा चिटणीस घोडके, कला सांस्कृतिक प्रतिष्ठान, ठाणे गौरव सेवा प्रतिष्ठान आणि व्यास क्रिएशन्स, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कथाकथन स्पर्धेत कु. आबोली शिंदे हिला प्रथम क्रमांक व चषक मिळाला.



**संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित मराठी वकृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांची यादी :**

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ६ वी | संस्कृती सिनलकर | तृतीय |
| ६ वी | आर्यन निमकर | तृतीय |
| ६ वी | देवश्री कुलकर्णी | तृतीय |
| ७ वी | अस्मी गोरे | द्वितीय |
| ७ वी | यशश्री दाभोळकर | उत्तेजनार्थ |
| ८ वी | ईशा लागू | प्रथम |
| ८ वी | रुचिता निमकर | उत्तेजनार्थ |
| ९ वी | श्रेया मोघे | द्वितीय |

**क्रीडा – DSO तर्फे घेतलेल्या विविध स्पर्धेत आमच्या विद्यार्थिनींनी खालीलप्रमाणे पारितोषिक मिळवले :**

• टेबल टेनिस – आद्यश्री जोग, मैथिली फाटक, रिद्धी पांढरे. तालुका पातळीवर U१४ मुलींच्या गटात रौप्य पदक मिळवले.



**जिज्ञासा ट्रस्ट आयोजित आंतरशालेय पथनाट्यस्पर्धेमध्ये आमच्या शाळेने भाग घेतला होता.**



सौ. वीणा जोशी लिखित व दिग्दर्शित पथनाट्य ''डिजिटल कुटुंब'' आपल्या शाळेने आंतरशालेय पथनाट्यस्पर्धेमध्ये ७ सप्टेंबर रोजी सादर केले.

**मराठी विज्ञान परिषद आयोजित पथनाट्यस्पर्धेचा निकाल**

आपल्या शाळेने १४ सप्टेंबर रोजी ''पाणी वाचवा'' पथनाट्याचे सादरीकरण केले. या स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. प्रस्तुत नाट्याचे लेखन व दिग्दर्शन सौ. वीणा जोशी यांचे होते.



**CASTIC – China Adolescent Science and Technology Innovation Contest निकाल :**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या शाळेतील २ विद्यार्थ्यांनी ३४ व्या China Adolescent Science and Technology Innovation Contest (CASTIC), चीन येथे भाग घेतला. कुमारी रमा राईलकर आणि कुमारी अवनी साठे या विद्यार्थिनींनी 'नापीक जमिनीचे सुपीक जमिनीत रूपांतर' हा प्रकल्प सादर केला. यासाठी त्यांना रौप्य पदके आणि प्रशिस्तीपत्रकाने गौरवले गेले.

आमच्या शाळेचे भाग घेण्याचे हे सलग १३ वे वर्ष असून आंतरराष्ट्रीय पातळीवर पारितोषिक मिळवण्याचे १२ वे वर्षे आहे. विद्यार्थिनींच्या मदतीने शाळने कांस्य पदकावरून रौप्य पदकाकडे झेप घेतली आहे.





## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### हिंदी दिवस साजरा



दि. १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अग्रवाल कॉलेज, कल्याण येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनीष मिश्रा यांचे 'मालेगाव का सिनेमा' या विषयावर व्याख्यान झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. अनिल ढवळे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. जयश्री सिंग, प्रा. संतोष राणे, प्रा. अनिल भाबड, प्रा. डॉ. प्रशांत धर्माधिकारी उपस्थित होते. हिंदी व बीएमएम विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

### विजू माने यांची चित्रपट निर्मिती कार्यशाळा



दि. १६ सप्टेंबर, २०१९ रोजी बीएमएम विभागातर्फे ज्येष्ठ दिग्दर्शक श्री विजू माने यांची संपूर्ण दिवसभर चित्रपट निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्तमोत्तम चित्रपट पाहिले पाहिजेत व त्यातून नवा विचार देणारा सिनेमा आपण निर्माण केला पाहिजे असे श्री. विजू माने म्हणाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक व बीएमएम विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत हजेरी लावली होती.

### इस्रोच्या चांद्रयान २ मुळे भारताचा जगात मान वाढला – ज्येष्ठ खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण

दि. १९ सप्टेंबर ,२०१९ रोजी ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे २० वे पुष्प

'चांद्रयान २ आणि इस्रोची ५० वर्षे' या विषयावर ज्येष्ठ खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी गुंफले.

ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशात मोलाची भर घालणाऱ्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्वर्यू राहिलेल्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या तपस्वी जीवनाला श्रद्धांजली म्हणून ही व्याख्यानमाला जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केली आहे.

दा. कृ. सोमण हे सर्वांना 'पंचांगकर्ते व खगोल अभ्यासक' म्हणून परिचित आहेत. खगोलशास्त्र या विषयाच्या प्रचारासाठी आणि माहिती पसरवण्याच्या हेतूने आत्तापर्यंत सात हजारांहून अधिक व्याख्याने दिली आहेत. गीतारहस्य, खग्रास सूर्यग्रहण, धूमकेतू या विषयांवर प्रत्येकी शंभर व्याख्यानांचा नुसता संकल्प केला नाही तर तो प्रत्यक्षात पूर्ण केला. सोमण मागील ४५ वर्षे निर्णयसागर, ढवळे, सोमण पंचांगाचे व निर्णयसागर, श्री महालक्ष्मी, साईनिर्णय, लोकमत, महाराष्ट्र दर्शन, वनवासी कल्याणाश्रम, भाग्योदय इत्यादी दिनदर्शिकांचे गणित करतात. आतापर्यंत त्यांनी अमेरिकेतील व युरोपमधील वेधशाळांना भेटी दिल्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी ज्येष्ठ पाश्चात्य तत्त्वज्ञ इम्यन्युअल कांट यांच्या वचनांचा उल्लेख करत एकूणच भारतीय मनिषेने खगोल शास्त्रात केलेल्या योगदानाचा उल्लेख केला.



ठाणे येथे वास्तव्यास असणारे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ दा. कृ. सोमण यांनी नुकताच सर्व भारतीयांना मान उंच करायला लावणारा आणि जगभर देशाचे नाव गाजवणाऱ्या चांद्रयान २ आणि त्या निमित्ताने इस्रोची ५० वर्षे या विषयावर विद्यार्थ्यांना अवगत केले.

व्याख्यान सुरू करण्यापूर्वी श्री. सोमण यांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला की, ''एखादा छंद जोपासा, समोरचा माणूस नाही म्हणतो तो उपकार करतो, रोज आपल्यात काय चांगला बदल झाला ते लिहा, मृत्यू पर्यंत कार्यरत रहा, आपण आपल्या जीवनाचे शिल्पकार प्रत्येक क्षण आनंदाने जगा.''

भारत कधीच, कोणत्याही गोष्टीत मागे नव्हता आणि यापुढेही नसेल. अनेकदा देशासमोर विविध समस्या उभ्या राहिल्या व तरीही न डगमगता खंबीरपणे त्यांना तोंड देत देश प्रगती करतच आहे असे ते म्हणाले.

यावेळी पुढे श्री. सोमण म्हणाले की, अगदी अंतिम क्षणी जेव्हा या मोहिमेत बिघाड आला त्यावेळी सोशल मीडियावर विविध ठिकाणी देश आणि देशवासी इस्रोच्या सोबत आहेत हे सांगितले जात होते ते पाहून खूप चांगले वाटले. यामुळे मोहिमेत सहभागी सर्वांना नवीन हुरूप मिळाला.

एकेकाळी अमेरिका, रशियासारखे देश भारताला मदत करण्यास तयार नव्हते अशावेळी इस्रोने स्वतःहून आपल्याला गरज असणारे तंत्र विकसित केले. हे जगाच्या तुलनेत खूप स्वस्त आहे, ज्यामुळे अनेक देश भारतीय अंतराळ संस्थेच्या मदतीने आपले उपग्रह अंतराळात सोडत आहेत. ही नक्कीच गर्वाची बाब आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा राजेबहादूर यांनी केले; तर संयोजन वृत्तविद्या विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

---

**संस्कृत दिनोत्सव**



दिनांक २०/०९/२०१९, शुक्रवार रोजी संस्कृत विभागा तर्फे 'प्राचीन ते अर्वाचीन संस्कृत प्रवास' कल्पने अंतर्गत 'संस्कृत दिनोत्सव' साजरा करण्यात आला. गोव्याचे श्री. प्रणव गोगटे, (संस्कृत भाषेचे प्रचारक आणि प्रसारक) या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. तसेच संस्कृत भारतीचे ठाणे विभागाचे संयोजक श्री. नारायण महोदय देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, नाटक इत्यादी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

संस्कृत भारतीचे कार्यकर्ते श्री. पंकज ठोंबरे यांनी प्राचीन ते अर्वाचीन संस्कृत प्रवास संस्कृत या विषयावर ppt च्या माध्यमाने संस्कृत भाषेचा वैज्ञानिक, वैदिक, साहित्यिक आणि शास्त्रीय प्रवास उलगडून दाखवला.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे कार्यक्रमास मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे अनेक मान्यवर प्राध्यापक उपस्थित होते.

संस्कृत विभाग प्रमुख प्रा. स्वाती भालेराव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमौलिक प्रयत्न केले.

**फिल्म सोसायटी तर्फे व्हीपलॅश या ऑस्कर पुरस्कार प्राप्त अमेरिकन चित्रपटाचे सादरीकरण**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालय फिल्म सोसायटीच्या वतीने दि २८ सप्टेंबर२०१९ रोजी व्हीपलॅश या ऑस्कर पुरस्कार प्राप्त अमेरिकन चित्रपटाचे सादरीकरण करण्यात आले.



८७ व्या अकॅडमी अवॉर्डस् मध्ये अनेक पुरस्कार पटकावणारा हा चित्रपट म्हणजे जॅझ संगीत शिकवणाऱ्या एका शिक्षकाची व ड्रम या वाद्यात गती असणाऱ्या विद्यार्थ्याची एक अनोखी गोष्ट आहे. चित्रपट सादरीकरण झाल्या नंतर विद्यार्थ्यांनी त्यातील अनेक प्रसंगांवर आपली मतं मांडली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी या चित्रपटाच्या संदर्भात आपली भूमिका मांडली. रोहन पिंगळे, वरद फणसळकर, ध्रुव कदम, सिद्धेश कारेकर, सौरभ तेली या विद्यार्थ्यांनी या प्रसंगी चर्चेत सहभाग घेतला. चित्रपटास बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**'शिक्षक दिन' उत्साहात साजरा**

दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी आय.एस.टी.ई. (ISTE) चॅप्टर २०१९ व्ही.पी.एम. पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन उत्साहात साजरा केला. सदर कार्यक्रमास प्राचार्य डॉ. डी. के. नायक व सर्व शिक्षक गण उपस्थित होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून विद्यार्थ्यांनी उपस्थित शिक्षकांचा सत्कार केला.

### रोटरी युथ लिडरशीप पारितोषके प्रदान

रोटरी क्लब ऑफ ठाणे आणि विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'Reimaging Leadership' हा लिडरशीप विषयीचा कार्यक्रम दि. १३ सप्टेंबर २०१९ रोजी पाणिनी सभागृह, डॉ. व्ही. एन. ब्रिम्स कॅम्पस, ठाणे येथे पार पडला.

ज्या-ज्या विद्यार्थ्यांनी लिडरशीप, टिप बिल्डींग आणि चांगल्या दृष्टीकोनातून प्रदर्शित केला. त्यांना रोटरी युथ लिडरशीप पारितोषिके देण्यात आली.





कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.३० वाजता दीप प्रज्वलन करून राष्ट्रगीताने करण्यात आली. सुरुवातीला सर्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले की, चार पद्धतीने चाचणी घेण्यात येईल. त्याचवेळी तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सदर कार्यक्रमाचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. रिटायर्ड श्री. एल. के. भारती (इंटरनॅशनल बँकर) यांनी सुंदर आणि साध्या शब्दात चांगल्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये अनेक उदाहरणांद्वारे स्पष्ट केली. डॉ. मोहन चंदावरकर (स्त्री रोग तज्ज्ञ) यांनी चांगल्या नेत्याचे समाजामध्ये वर्तन कसे असायला पाहिजे याचे विवेचन केले. त्यांचे भाषण फारच स्फूर्तीदायक होते. चांगल्या नेतृत्वगुणाचा विकास होणे आवश्यक आहे व त्याचबरोबर कल्पनेने दुसऱ्याच्या अंतकरणात शिरून त्याच्या भावना जाणून घेण्याची कुवत आणि संयम याद्वारे समाजामध्ये चांगला आशावाद निर्माण केला पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

सेवानिवृत्त डॉ. रुपाली देशपांडे (संचालक फाराइव्हर) यांनी 'उदि्ष्ट निश्चिती' बद्दल विचार व्यक्त केले आणि उदि्ष्ट निश्चितीचे वेगवेगळे मार्गही सुचविले. रिटायर्ड सतीश भोजणे (संचालक ३६०) यांनी खेळाचे विविध गट स्थापन केले आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाचे पैलू मोजले. विद्यार्थ्याचे प्रत्येकी सहा जणांचे गट केले आणि प्रत्येक गटाला वेगवेगळे कार्य देऊन ती पार पाडण्याची संधी दिली. त्यातून त्यांच्यामध्ये असलेल्या नेतृत्व गुणाची पारख करण्यात आली. या सर्व खेळाचे नियोजन श्री. भोजणे यांनी अतिशय योग्य पद्धतीने केले होते.

शेवटी बेस्ट टीम, बेस्ट लिडर, RYLA - किंग RYLA - क्वीन आणि स्पिरिट ऑफ RYLA इत्यादी पारितोषिके सदर प्रसंगी प्रदान करण्यात आली.

पारितोषिके प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | पारितोषिक |
|---|---|
| १) प्रवीण दशडे | Best Leader |
| २) पारितोष गंदरे | RYLA - King |
| ३) झुआ मोमीन | RYLA - Queen |
| ४) नुराग नाडकर्णी | Spirit of RYLA - Award |
| ५) जयस्तुते गट | सर्वोत्तम गट |

सदर कार्यक्रमात सहभागी झालेल्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली. सौ. राधिका कामत यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे काम पाहिले.

**'अभियांत्रिकी दिन' उत्साहात साजरा**

आय.एस.टी.ई. (ISTE) चॅप्टर वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनच्या २०१९ च्या विद्यार्थ्यांनी '१५ सप्टेंबर' या अभियांत्रिकी दिनाचे आयोजन तंत्रनिकेतनच्या ए.व्ही. रुम येथे करण्यात आले होते. सदर दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम केला. शास्त्र, तंत्रज्ञान, खेळ, गणित, सामान्य ज्ञान जागतिक घडामोडी वरील विविध प्रश्नाचा समावेश त्यामध्ये होता. द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक, तृतीय वर्ष इन्स्ट्रुमेंटेशनच्या विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक आणि तृतीय वर्ष इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

**'महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ (MSBTE) पुरस्कृत टेक्नीकल पेपर सादरीकरण स्पर्धा' पॉलिट्रॉनिक्स – २०१९ चे यशस्वी आयोजन**




'महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ (MSBTE)' दरवर्षी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता व्यावसायिक संभाषण आणि सादरीकरण कौशल्ये विकसीत व्हावीत हा प्रमुख उद्देश साध्य होण्याकरिता टेक्निकल स्पर्धांचे आयोजन करीत असते. ह्यावर्षी MSBTE ने विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे या संस्थेला स्पर्धा आयोजनचा मान दिला होता. सदरची स्पर्धा ही इलेक्ट्रॉनिक्स ग्रुपच्या विद्यार्थ्यांकरिता होती. सदरची संस्था नेहमीच विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स संबंधी लेखन आणि सादरीकरणास स्फूर्ती देते आणि त्या संबंधीचे विचार व्यक्त करण्यासाठीचे व्यासपीठ मिळवून देते.

संस्थेच्या इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्स्ट्रुमेंटेशन या दोन्ही विभागाने ही स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धा ही २० सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ९.०० ते ४.४५ वा. या वेळेत तंत्रनिकेतनच्या ए. व्ही. रुममध्ये पार पडली. स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्री. राजेश शहा (Nice Consultancy) आणि श्री. जी. टी. हळदणकर (सहाय्यक प्रोफेसर, SPIT मुंबई) यांनी काम पाहिले. मुंबई विभागातून विविध पदविका शिक्षण देणाऱ्या प्रमुख संस्थामधून टेक्निकल पेपर सादरीकरणासाठी विद्यार्थी आले होते.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळा बरोबर १०.०० वाजता झाला. सौ. एस. डी. खंडागळे (लेक्चरर, इन्स्ट्रुमेंटेशन विभाग) यांनी प्रमुख पाहुणे आणि उपस्थितांचे स्वागत केले. प्रोफेसर व्ही. ए. जोशी (इन्स्ट्रुमेंटेशन विभाग प्रमुख) यांनी स्पर्धेचे महत्त्व सांगितले व अशा स्पर्धांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळेल व ते जेथे काम करतील तेथे ते उत्कृष्ट कार्य त्याच्या हातून होईल व त्या ठिकाणची चांगली वृद्धी होईल, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांनी सदर स्पर्धा आयोजनचा मान तंत्रनिकेतनला दिल्याबद्दल MSBTE चे आभार व्यक्त केले व तांत्रिक पेपर सादरीकरणाचे महत्त्व सांगितले.

प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. एच. ए. मंगळवेढेकर (प्रोफेसर आणि माजी विभाग प्रमुख, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभाग VJTI, मुंबई) उपस्थित होते. त्यांनी वाङ्मय सर्व्हे, संशोधन आणि वाङ्मय चौर्य इत्यादी विषयींचे आपले विचार व्यक्त केले आणि शोधनिबंध कसा तयार करावा हे सांगितले.

प्रोफेसर टी. व्ही. मोहिते-पाटील (प्रोग्रॅम को. ऑर्डिनेटर आणि विभाग प्रमुख मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स) यांनी स्पर्धेविषयी नियम आणि शिस्त या संबंधीची कल्पना विद्यार्थ्यांना दिली.

सौ. सान्थी एम. लिगडुआ (लेक्चरर, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स) यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख उपस्थितांना करून दिली व सौ. ज्योती साजी (लेक्चरर, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स) यांनी आभार व्यक्त केले.

सदर कार्यक्रम सकाळी १०.३० वाजता सुरू झाला व नंतर परिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या टीमने आपले विचार व्यक्त केले. सर्वच टीमने परिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न केला.

स्पर्धेत सादर झालेले शोधनिबंध हे प्रामुख्याने E-Waste (ई-वेस्ट), शेतीतील यांत्रिकीकरण, Internet of Things (IOT), Applications of Nanotechnology in electronics and zig Bee wireless technology इत्यादी होते.

शेवटी परिक्षकांकडून निकाल जाहीर करण्यात आला. शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई प्रथम, व्ही. ई. एस. तंत्रनिकेतन, चेंबूर दुसरे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक अब्दुल रझाक काळसेकर तंत्रनिकेतन, पनवेलला प्राप्त झाले.




शेवटी सदरची स्पर्धा यशस्वी झाल्याबद्दल आयोजकांकडून सर्वांचे आभार मानण्यात आले.

**विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतन ग्रंथालयात राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुस्तकांचे प्रदर्शन**




२ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या जयंती निमित्त तंत्रनिकेतन ग्रंथालयात महात्मा गांधीजींच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. सदर प्रदर्शनात महात्मा गांधीजींचे प्रसिद्ध आत्मचरीत्र 'माझे सत्याचे प्रयोग' हा ग्रंथ ठेवण्यात आला होता. त्याचबरोबर इतरही ग्रंथ होते. उदा. My Story of my Life, Truth is God, All mens are Brothers, To Students इत्यादी. महात्मा गांधीजींची सदरची १५० वी जयंती होती. डॉ. राजन वेळूकर यांनी लिहिलेला Gandhi@150 हा ग्रंथही सर्वांचे आकर्षण वेधून घेत होता. शिवाय गांधी विचारांचे फलक लावले होते. महात्मा गांधीजींचे पहिले सत्याग्रही विनोबाजींचे ग्रंथही प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

प्रसिद्ध 'श्यामची आई' हा संस्कारक्षम ग्रंथही प्रदर्शनात ठेवण्यात आला होता. सदरचे प्रदर्शन दोन दिवस सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले होते. प्रदर्शनाचा लाभ विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गानी घेतला.

प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी वर्गाकडून सहकार्य लाभले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**सप्टेंबर २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**




१ सप्टेंबर: डॉ. नीतिन जोशी आणि सह-लेखक डॉ. डी. आर. राजगोपालन यांचे सर्व्हिस ऑपरेशन्स मॅनेजमेन्ट: टूवर्ड्स एक्सलन्स हे पुस्तक प्रकाशित झाले.

६ सप्टेंबर: डॉ. व्ही. एन. ब्रीम्स तर्फे क्योटो सांग्यो युनिव्हर्सिटीच्या जपानी विद्यार्थ्यांसाठी डॉ. पल्लवी, डॉ. मीनाक्षी आणि एमएमएस आणि पीजीडीएमच्या विद्यार्थ्यांनी कल्चरल एक्सचेंज प्रोग्रामचे आयोजन केले.



८ सप्टेंबर: प्रा संदीप मोघे यांनी एआयसीटीई, नवी दिल्ली येथून संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिलच्या स्थापनेचे प्रमाणपत्र प्राप्त केले.

९-११ सप्टेंबर: डॉ. स्मिता जपे यांनी डॉ. माधुरी पेजावर यांच्यासमवेत वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी NAAC चे चाचणी मूल्यांकन केले.

११ सप्टेंबर: राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) द्वारा डॉ. व्ही. एन. ब्रीम्सला 'बी ++' दर्जा देण्यात आला. ब्रीम्स मधील अभ्यासक्रम, अध्यापन-शिक्षण प्रक्रिया, विद्याशाखेच्या संबंधित शैक्षणिक प्रक्रिया आणि परिणामांशी संबंधित कामगिरी, औद्योगिक क्षेत्राशी असलेले संबंध, संशोधन, पायाभूत सुविधा, शिक्षण संसाधने, संघटना, आयएसओ ९००१: २०१५ आणि विद्यार्थी सेवा अशा गुणवत्तेच्या दृष्टीने मानदंड असलेल्या बाबींचे कौतुकही समिती तर्फे करण्यात आले.




१३ सप्टेंबर: डॉ. मीनाक्षी आणि डॉ. पल्लवी यांनी ब्रीम्सचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी वर्ग आणि एकूणच संस्था यांचे कार्य व कार्यक्रम यांची माहिती सांगण्यासाठी 'ब्रीम्स कनेक्ट - एक परस्परसंवादी विद्यार्थी मंच' या कार्यक्रमाचे आयोजन केले.

१४ सप्टेंबर: इंडियन इंटरफेस समिती तर्फे प्रा. कंचन आणि प्रा. विभूती यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांसाठी इंडियन एक्स्प्रेस, नवी मुंबई येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले.



१४-१५ सप्टेंबर: डॉ. नीतिन जोशी यांनी टेक्नोवा कंपनीतील कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी कॉर्पोरेट प्रशिक्षण घेतले.

१८ सप्टेंबर: २०१९-२१ च्या एमएमएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. पल्लवी आणि डॉ. मीनाक्षी यांनी केले.



१९-२० सप्टेंबर: डॉ. स्मिता जपे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवस्थापन विषयातील मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले.

२० सप्टेंबर : प्रा. संदीप यांनी अभिमुखता कार्यक्रमात एमएमएस - पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयटी स्किल फॉर मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्म या विषयावर व्याख्यान दिले.



२१ सप्टेंबर : प्रा. कंचन आणि प्रा. विभूती यांनी आयोजित केलेल्या औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी औद्योगिक भेटीवर आधारीत अनुभवांबद्दल/शिक्षणाबद्दल सादरीकरण केले होते या संदर्भात डीब्रिफिंग करण्यासाठी इंडियन एक्सप्रेसच्या व्यवस्थापकांना आमंत्रित करण्यात आले.

२१ सप्टेंबर: प्रा. कांचन यांनी ब्रीम्स आणि बीएमए यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, श्री. शिरीष जोशी यांच्या 'फ्यूचर स्किल्स: २०२५' विषयावरील चर्चासत्राच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.

२४ सप्टेंबर: श्री.संजय सपकाळ यांनी प्रथम वर्षाच्या एमएमएस विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परिचय कार्यक्रमाचे आयोजन केले.

२६ सप्टेंबर: डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे विद्यार्थी, प्रवीण चिकणे, स्वपन चौधरी आणि सुशांत जोंधळे यांनी फ्रा. एंजल बिझिनेस स्कूल, वाशी येथे झालेल्या मॉक स्टॉक स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक जिंकले. स्वपन चौधरी यांनी बेस्ट मॅनेजर या स्पर्धेत देखील द्वितीय क्रमांक पटकाविला.




२६ सप्टेंबर: डॉ. स्मिता जपे यांनी अभिमुखता कार्यक्रमात प्रथम वर्षाच्या एमएमएस विद्यार्थ्यांसाठी वित्तीय लेखाची मूलभूत तत्त्वे आणि संकल्पना या विषयावर व्याख्यान दिले.

२६ सप्टेंबर: प्रा. कंचन यांनी, प्राध्यापक सदस्यांसाठीच्या एफ. डी. पी. अंतर्गत पर्सनल ब्रांडिंग अँड प्रोफेशनल

इमेज या विषयावर श्रीमती रविजा श्रीवास्तव यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले.



२७ सप्टेंबर: डॉ. पल्लवी आणि डॉ. स्मिता जपे यांनी एमएमएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या शपथविधीचा कार्यक्रम आयोजित केला.



२७ सप्टेंबर: महिला विकास कक्ष अंतर्गत डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पल्लवी यांच्यावतीने हिंदुस्तान शिपयार्ड कंपनीच्या श्रीमती प्रीती सिंग यांचे आयोजित केलेल्या Zero tolerance and prevention of sexual harassment या विषयावरील अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.



२८ – २९ सप्टेंबर : डॉ. नीतिन जोशी यांनी टेकनोवा कंपनीतील कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी कॉर्पोरेट प्रशिक्षण घेतले.



२८ सप्टेंबर : डॉ स्मिता जपे यांनी माजी विद्यार्थी समितीची बैठक आयोजित केली होती व प्रा. महेश भानुशाली या बैठकीला उपस्थित होते. तसेच डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी प्रथम वर्षाच्या एमएमएस विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थ्यांचे संवाद–सत्र आयोजित केले.



प्रा. कृणाल के. पुंजानी यांचा शोध निबंध ट्रेंड्स ऑफ पफरी इन ॲडव्हर्टायझिंग – अ बिब्लिओमेट्रिक अनालिसिस, स्कॉपस आणि एबीडीसी इंडेक्सड आणि आंतरराष्ट्रीय जर्नल –बेंचमार्किंग खंड. २६ क्रमांक ८. मध्ये प्रकाशित झाला.

प्रा. सिद्धेश यांची (आर्थिक पात्रतेच्या कसोटीवर आधारित) समुपदेशन सत्रे सप्टेंबरमध्ये संपन्न झाली. वित्त शाखेतील एकूण ४६ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

❉ संपर्क ❉

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.